# चंद्रावर स्वारी



ग. कृ. कालेलकर

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ८५८



REFBK-0007771

★

“……‘चंद्रावर स्वारी’ या लघुनिबंधसंग्रहाच्या लेखकाचें वय आणि अनुभव लक्षांत घेतां, हे निबंध खरोखरच अपेक्षेपेक्षां आकर्षक आहेत. निबंधकाराचें निरागस व्यक्तित्व आणि खेळकर भाषाशैली आनंद देतात. जसजसा अनुभव वाढत जाईल आणि व्यक्तित्व विकसित होत जाईल तसतसे अधिक भरदार निबंध श्री. कालेंकर लिहितील यांत मुळींच शंका नाहीं……”

—प्रा॰ अनंत काणेकर

★

# चंद्रावर स्वारी !

[ आणि इतर लघुनिबंध ]

नों. नं. १३७३७
१०।९।५३
नि. ८७८

REFBK-0007771

७७७१

ग. कृ. कालेकर

किंमत अडीच रुपये

श्री समर्थ बुक डेपो प्रकाशन,
गिरगांव, मुंबई ४.

प्रकाशक: —
रा. त्र्यं. देशपांडे,
श्री समर्थ बुक डेपो,
गिरगांव, मुंबई ४.

● मुखपृष्ठावरील चित्र श्री. दीनानाथ दलाल
यांचें आहे.

मुद्रक:—
वि. सी. पुराणिक,
शिवाजी प्रिंटिंग प्रेस,
दादर, मुंबई २८.

गेल्या वर्ष दीड वर्षांत लिहिलेल्या लघुनिबंधांचा हा संग्रह आहे. लघुनिबंध लिहिण्याकरितां वयाची जी मर्यादा गांठावी लागते म्हणतात, ती मी अद्याप गांठलेली नाहीं. जगाच्या नाना तऱ्हा, मानवी व्यवहाराचीं रहस्यें आणि मानवी मनाचे नाजुक पापुद्रे मी अद्याप पाहिलेले नाहींत. माझं अजूनपर्यंतचं विश्व अगदीं कोतं आहे. तरीही हें धाडस मी केलं आहे.

या संग्रहांतील "शनिवार, रविवार आणि स-स-सोमवार!" आणि "शेवट" या दोन लघुनिबंधांची मध्यवर्ती कल्पना मराठींतील दोन बड्या लघुनिबंधकारांच्या निबंधांवरून घेतली आहे. त्यांचा मी ऋणी आहे.

पुस्तक छपाईच्या कांहींशा घाईमुळें व कांहींशा अज्ञानामुळें शुद्धलेखनाच्या कांहीं चुका तशाच राहून गेल्या आहेत. क्षमस्व.

आणखी एक गोष्ट अगोदरच सांगून टाकलेली बरी. निबंधांत वावरणारीं पत्नीसकट सर्व पात्रें काल्पनिक आहेत.

या पुस्तकप्रकाशनाचे वेळीं मी पुण्याचे श्री. कृ. वा. मोडक व रत्नागिरीचे श्री. बाबीराव गोडबोले यांचा उल्लेख केला नाहीं तर तें कृतघ्नपणाचं ठरेल, असं निदान मला तरी वाटतं. हे दोघेही माझे शिक्षक आणि पालक होते अन् आजही आहेत. त्यांचे माझ्यावर जे उपकार झाले आहेत, त्याबद्दल कृतज्ञताभाव व्यक्त करण्यापलीकडे मी काय करणार?

२३, बॉंबे को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, सायन, मुंबई २२

—ग. कृ. कालेकर

१-४-१९५२

१ ..य नमः। ...य नमः !! ... ...
२ ओळखीच्या मुली ... ...
३ समजूत ... ...
४ वाटावं लागतं...... ... ...
५ शनिवार, रविवार आणि स-स-सोमवार ! ...
६ टाळी ... ...
७ मर्जी ... ...
८ शेवट ... ...
९ किंचाळणाऱ्या आणि कुजबुजणाऱ्या ! ...
१० आळोखे ... ...
११ माझे मित्र ... ...
१२ सही ... ...
१३ कल्पना ... ...
१४ पहिलं ?...छे ! शेवटचं !! ... ...
१५ दोन स्वप्नें ... ...
१६ असं झोंपावं... ... ...
१७ आपण-तुम्हीं-तूं !!! ... ...
१८ चिंगी चहा पित्ये ! ... ...
१९ देव आणि मी ... ...
२० चंद्रावर स्वारी ! ... ...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ......
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

१

# ....य नमः !....य नमः !!

“पाहिलीत का, पाहिलीत कां—
सोनुकली चंद्रकोर पाहिलीत का ?”
“वाग वा खुळे, कोर कोठली ?
चिरतांना कांद्याची पाकळी ही राहिली !”

मराठी शाळेंतल्या सात आठ परकऱ्या पोरींनीं म्हटलेलं गाणं मला त्यावेळीं अतीशय आवडलं होतं आणि आजही तितकंच आवडतं. मराठी शाळेंत शिक्षक असलेल्या माझ्या एका मित्राच्या आग्रहावरून मी त्याच्या शाळेंत कसल्या तरी समारंभाला गेलों होतों. त्याला माझ्याकडून आपलं कौतुक करवून घ्यायचं होतं. मुलींनीं केलेले सर्वच कार्यक्रम मला अतिशय आवडले. पण त्यांचं एक नृत्य मला अतिशय आवडलं. “सोनुकली चंद्रकोर पाहिलीत का ?” अशी पृच्छा एक मुलगी करी, व दुसरी मुलगी पुढं येऊन तिला सांगे—“अग ! ती कांहीं कोर नव्हे—” आणि तें काय

आहे, याचं निरनिराळें वर्णन प्रत्येकजण करी. एका मुलीनं नी चिरतांना कांद्याची राहिलेली पाकळी आहे, असं सांगितलं. तिचा त्या वेळचा तो नखरा, मानेची लकब, आवाजाचा गोडवा आणि अभिप्रेत असणारा अर्थ....बस्स! आल्याचं अगदीं सार्थक झाल्यासारखं वाटलं मला!

पण नंतर माझं मलाच कळून आलं कीं माझ्या आनंदाचं खरं कारण दुसरंच कांहीं आहे! मुलीचा तो अंगविक्षेप किंवा नादमाधुर्य यांहीपेक्षां माझ्या हृदयांतील निराळ्याच एका कप्प्याला तिनें अजाणतेपणानें हात घातला आहे. तिनें चंद्राला कांद्याच्या पाकळीची उपमा दिली......होय, माझ्या हृदयाला अगदीं गुदगुल्या झाल्यासारखं वाटलं.

कांद्याबद्दल मला स्वतःला अतीशय प्रेम वाटतं, आणि कांदा खाल्याशिवाय माझा एकही दिवस जात नाहीं. कांद्याचं नांव काढतांच आणि त्याचा वास येतांच तोंडाला पाणी सुटतं. कोणी कांहीं कांद्याबद्दल बोलूं लागलं तर माझे कान आपोआप तिकडे वळतात. कांद्याचे बनवलेले निरानिराळे पदार्थ मला सारखेच प्रिय वाटतात. आणि कांद्याशिवाय दिवस काढण्याची पाळी आली तर काय प्रसंग ओढवेल, याची कल्पना करतांकरतां माझ्या अंगाला घाम सुटतो. कांद्याचा मी निस्सीम उपासक आहे. म्हणून प्रथमच ज्यानें कांदा शोधून काढला, त्याला मी नमस्कार करतों.

कांद्याइतकंच माझं दुसरं कशावर प्रेम असेल, तर तें चहावर. खरं म्हणजे कांद्यापेक्षांही माझं चहावर जास्त प्रेम आहे. नाहीं म्हटलं तरी कांद्याशिवाय एखादा दिवस काढणं कांहीं तितकं

कठिण नाहीं. पण चहाशिवाय दोनचार तास घालवणेंही मला कठिण आहे. घरीं आणि घराबाहेर मिळून दररोज मी कितीदां चहा घेतों, हें सांगणं कठिण आहे. आणि कधीं कुठं चहा मिळाला नाहींच, तर इराण्याच्या हॉटेलांतला पावडरचा काढ्यासारखा लागणारा चहाही मी तितक्याच आनंदानें पितों.

इंटरला असतांना जगाचा इतिहास मी वाचला होता. त्या इतिहासांतील कांहीं भाग आजही माझ्या लक्षांत आहे. चीनची जगाला देणगी कोणती? चहा! चीनचा प्राचीन महापुरुष कन्फ्युसिअस याच्या ग्रंथांत चहाचा उल्लेख आहे. अडीच हजार वर्षांपूर्वी हा महापुरुष चीनमध्यें होऊन गेला. आपल्या अनुयायांना तो म्हणतो–"सर्वांशीं चांगले वागा. आपल्याला अनोळखी असलेल्या माणसालादेखील नीट वागवलं पाहिजे. जर त्यानं "मी तहानलेला आहे" असं तुम्हांस म्हटलं तर त्याला चहाचा एक कप द्या. त्याचे पैसे घेऊं नका!"

कन्फ्युसिअसचा हा आदेश मी वाचला आणि मला तो एकदम पटला. मी त्याप्रमाणें आचरण सुरू केलं आणि माझ्या मित्रांना देखील तसं करायला सांगूं लागलों. कन्फ्युसिअसबद्दल आणि जगभर चहाचा प्रसार करणाऱ्या चीनबद्दल मला तेव्हांपासून अतीशय आदर वाटूं लागला. चीनच्या राजकीय घडामोडींकडे माझं पूर्ण दुर्लक्ष असलं तरी देखील मला चीनबद्दल अतीशय आपुलकी वाटते. म्हणूनच चहाला जन्म देणाऱ्या चीनच्या आदिमहापुरुषाला मी वंदन करतों.

लज्जतदार चहाचे घोट घेतल्यानंतर सिगारेट शिलगवण्याचा मोह निदान मला तरी अनावर होतो. त्या वेळीं मिळेल ती सिगारेट मी घेतों, काड्याच्या पेटीवर उगाच ठोकल्यासारखी करतों, आणि थोड्याच वेळांत असा कांहीं झुरका मारतों कीं बस्स ! लोकांनीं नुसतं पाहात रहावं ! धूम्रवलयें सोडण्यांत जी मजा आहे, तितकाच आल्हाद तोंडांत जळती सिगारेट ठेवून कांहींतरी काम करीत रहाण्यांत आहे. तास दोन तास चहा नसला तरी सिगारेटच्या संगतींत मी चहाच्या वियोग सहन करूं शकतों. पण सिगारेटच्या वियोगाची कल्पनाही सहन होत नाहीं. नेहमीं बाहेर जातांना मी खिशांत हात घालून पाहातों कीं आपल्या खिशांत सिगारेटचं पाकिट आहे कीं नाहीं. आणि अचानकपणें सिगारेटी संपल्या कीं कांहीं सुचेनासं होऊं लागतं. म्हणूनच सिगारेटच्या जनकाला आदरानें मुजरा करणं माझं कर्तव्य ठरतं.

गरम गरम चहाचा एक कप संपविला आणि सिगारेटचे एक दोन झुरके मारले म्हणजे मग सुपारीचं एखादं खांड तोंडांत टाकावं, असं वाटूं लागतं. आमच्या कोंकणांत सुपारीच्या बागाच बागा असल्यानं घरांत सुपारी नाहीं असं कधींच व्हायचं नाहीं. पुष्कळदां आम्हांला अगदीं कोवळं कोंवळं पोफळ मिळायचं, त्याची लज्जत तर कांहीं औरच ! मला वाटतं तेव्हांपासूनच सुपारीची ही संवय लागली असावी. त्यामुळं सुपारीचं एखादं खांड तरी तोंडांत टाकायला मिळालं नाहीं, तर मी अस्वस्थ होतों. अगदीं नेहमीं नसली तरी तासातासानं सुपारी ही हवीच. सुपारीच्या जनकाला मी हात जोडून नमस्कार करतों.

पण या जगांत अशा कितीतरी गोष्टी आहेत कीं ज्यांच्या-शिवाय माझं चालणं शक्य नाहीं. अगदीं क्षुल्लक अशा वाटतात त्या इतरांना. पण मला त्या अत्यावश्यक आणि म्हणूनच अतीशय महत्त्वाच्या वाटतात. त्या सर्वांची यादी कुठं करीत बसूं? संध्या करतांना एकवीस देवांना वंदन करायचं असतं. पण केशवायनमः नारायणायनमः माधवायनमः गोविंदायनमः एवढीं चारच नांवें घेऊन उदक सोडतात. मीही कांदा, चहा, सिगारेट आणि सुपारी यांच्या जनकांना नमस्कार करून उदक सोडतों.......

# २

# ओळखीच्या मुली

आपल्या ओळखीच्या व्यक्तींबद्दल विचार करीत बसणं हा माझा अतीशय आवडीचा विषय होऊन बसला आहे. आपल्या इतक्या ओळखी आहेत, आपले इतक्या लोकांशीं संबंध आले. कांहींजण आपल्याजवळ अतीशय प्रेमानं वागले, कांहींनीं खरी माया दाखविली, कांहीं कपटानें वागले, कांहींनीं फसविलं. एखाद्या वृक्षावर पक्षांचा थवा येऊन बसावा आणि थोड्याच वेळांत तो उडून जावा, तशा कितीतरी व्यक्ती माझ्या जीवनांत आल्या अन् गेल्या. कांहींच्या अस्पष्ट आठवणी शिल्लक आहेत तर कांहीं स्मृति-पटलावरून केव्हांच पुसल्या गेल्या आहेत. पण या सर्वांसंबंधीं विचार करीत बसणं मला अतीशय आवडतं.

त्यामुळंच परवां जेव्हां एकानें प्रश्न टाकला कीं ओळखीच्या मुलींबद्दल तुला काय वाटतं आणि मला स्पष्ट उत्तर देतां येईना तेव्हां मी अगदींच गांगरून गेलों. स्वतःला खूप शहाणा समज-

णाऱ्या आणि प्रत्येकाबद्दल विशिष्ट मत असलेल्या मला त्या प्रश्नानें चांगलेंच बुचकळ्यांत टाकलें.

आणि माझं मलाच कळून आलं कीं ओळखीच्या मुलींबद्दल मी तसा विचार अजून केलेलाच नाहीं. माझ्या ओळखीच्या एकंदर किती मुली आहेत, याचा मी विचार करूं लागलों. एवढ्या महत्वाच्या आणि नाजुक प्रश्नाचा आपण कधीं विचारही केला नाहीं......मला रागच आला स्वतःचा !

ओळखीच्या मुलींबद्दल मी जास्त जास्त विचार करूं लागलों आणि विचार करतां करतां चांगलाच गोंधळून गेलों.माझ्या आजवरच्या आयुष्यांत ओळखीच्या झालेल्या अनेक मुली मी डोळ्यांपुढें आणल्या. माझ्या कॉलेजच्या जीवनांतील निरनिराळ्या कुमारिकांबद्दल मी विचार करूं लागलों. इतर बाहेरच्या ओळखी, माझ्या दूरदूरच्या वहिणी, मित्रांच्या बहिणी, शेजारच्या मुली, सर्वांचा मी विचार करूं लागलों आणि सर्वसाधारण मत बनविण्याचा प्रयत्न करूं लागलों. किती अवघड काम होतं तें !

ओळखीच्या मुलींच्या बाबतींत कित्येकदां अगदीं चमत्कारिक प्रसंग घडून येतात. एखाद्या रस्त्यानें आपण घाईघाईनें आपल्याच तंद्रींत जात असावं आणि समोरून एखादी ओळखीची मुलगी येत असावी. तिच्याजवळ कांहीं बोलावं तरी पंचाईत, न बोलावं तरी पंचाईत. तिच्याजवळ कांहीं बोलावं तर लोक दुसऱ्यांना खुणावणार आणि कांहींच न बोलतां जायचं म्हटलं तर तें तरी बरं दिसतं का ? तिला काय वाटेल ? ती स्वतःहून बोलण्याइतकी धीट असली म्हणजे मग तर खरी पंचाईत......

ओळखीच्या मुलींचा प्रश्न जरासा चमत्कारिक आणि त्या-बरोबरच धोक्याचा आहे खास! एक मुलगी माझ्या अगदीं चांगल्या परिचयाची आहे. ज्या गुणांमुळें स्त्रीला स्त्री म्हणण्यांत येतं त्या गुणांचा तिच्यांत पूर्णपणें अभाव आहे. ह्या मुलीचं वैशिष्ट्य म्हणजे, ती कुठेंही भेटली तरी मोठ्यानें हांक मारल्याशिवाय जायची नाहीं. आधीं कोणत्या नांवानें हांक मारील, तें नक्की नाहीं. ज्या दोनचार नांवांनीं मी प्रसिद्ध आहे, त्यापैकीं असं नांव शोधून काढील कीं चार चौघांसमोर आपली अगदींच "ही" व्हावी! वरं, हांक मारूनच काम भागलं असतं, तरी हरकत नव्हती. पण ती भेटली कीं इकडच्या तिकडच्या चार गप्पा, कुठें गेला होतास, आमच्याकडे कां नाहीं आलास, अशी जबानी आणि उलटतपासणी! सर्वच मुलांना हा अनुभव येत असल्यानं मला तसं भिण्याचं कांहींच कारण नव्हतं!

आणि दुसरी एक मुलगी याच्या अगदीं उलट आहे. तिच्याच आग्रहावरून आम्हीं एकदां तिच्या गांवीं तिच्या घरीं गेलों होतों. तिच्या घरीं देखील ती इकडच्या तिकडच्या चार मनमोकळ्या गप्पा मारायला तयार नाहीं. स्त्रियांच्या जातीला कांहीं मर्यादा असावी हें खरं. पण त्याचाही अतिरेक होतां कामा नये. विनयाला देखील कांहीं मर्यादा आहेतच कीं नाहीं? पण हिची तऱ्हाच न्यारी. कांहीं बोलायचंच झालं तर तें दाराच्या पडद्याआडून म्हणजे बुरखा घेतलेल्या स्त्रीसारखं. कशाला हिच्याकडे आलों, असं झालं मला.

माझ्या चांगल्या परिचयाची दुसरी एक मुलगी आहे. तिच्याकडे जायला मला फारच भीति वाटते. एखादा कर्जदार पठाणाकडे जातांना जसा भीत भीत जातो, तशीच माझी अवस्था होते. फार वर्षांपासूनची ओळख आणि थोडंसं दूरचं नातं असल्यानं मला मधूनमधून तिच्याकडे जावं लागतं. एखाद्या पठाणाच्या रुबाबांत ती माझं स्वागत करते आणि त्याच थाटांत कांहीं वेळानं बोळवण करते. परत येतांना इतका आराम वाटतो कीं सांगता सोय नाहीं. अशा वेळीं "भयचकित नमावें तुज रमणी" हा चरण अगदीं बरोबर पटतो.

आणि ओळखीच्या मुलींबद्दल मी जसजसा जास्त विचार करूं लागलों, तसतसं मला अधिक अधिक आश्चर्य वाटूं लागलं. माझ्या ओळखीची एक मुलगी अशा कांहीं पद्धतीनें चालते कीं इतर मुलींना तिचा हेवा वाटावा आणि तरुणांनीं हाय-हाय करीत टक लावून पाहात बसावं. दुसरी एक अतिशय लठ्ठ मुलगी अतीशय भराभर चालते. एकदां धांवण्याच्या शर्यतींत ती पहिली आली, हें पाहून माझ्या डोळ्यांवर माझा विश्वासच बसेना. दुसरी एक अतिशय कुरूप मुलगी सिनेनटीलाही लाजवील असा मेकअप करते आणि स्वतःच्या सौंदर्याचं खरं प्रदर्शन घडविते. दुसरी एक मुलगी इतक्या साधेपणानं वागते आणि स्वतःच्या खोल वाचनाचं असं कांहीं प्रदर्शन करते कीं आमची हंसतां हंसतां पुरेवाट व्हावी. दुसरी एक दिवसभर लोकरीचें विणकाम करीत बसलेली असते. एक दिवसभर वाचीत बसलेली असते. एक दुसरं कांहींही न करतां आपलीं भावंडें खेळवीत बसलेली असते. एक आपला सर्व वेळ घरकाम करण्यांत घालविते तर दुसरी एक संबंध दिवस गांवभर भटकत असते. एक दोरीवरून उड्या मारीत असते तर दुसरी एक

धांपा टाकीत आणि उगाच खिदळत अन् मोठ्यानं हंसत बॅडमिंटन् खेळत असते.

जसजसा जास्त विचार करूं लागावं, तसेतसे ओळखीच्या मुलींचे तऱ्हेवाईक नमुने डोक्यांत गर्दी करतात. प्रत्येकीची तऱ्हा पाहावी ती निराळी. आणि प्रत्येकीची नटण्याबागडण्याची हौस तरी किती भिन्न असते! "मेक्‌अप" करायला एकीला बरोबर तास लागतो तर एक तशीच उठून सकाळच्या कॉलेजांत जाते. एकीचं पातळ दिवसांतून किती तरी वेळां बदलतं, तर एकीचं नऊ-वारी लुगडं आठ आठ दिवस बदलत नाहीं! एकीच्या दोन वेण्या झुलत असतात तर दुसरी अंबाडा मुद्दाम किंचित सैल करते!

आणि शेवटीं मी जेव्हां ओळखीच्या मुलींबद्दल काय वाटतं याचं निश्चित उत्तर देण्याचा प्रयत्न करूं लागतों, तेव्हां तर मला कांहींच सुचेनासं होतं. सतरा प्रकारच्या सतरा मुली माझ्या डोक्यांत झिम्मा खेळूं लागतात. त्यांचा पकवा सुरू झाला कीं मी अगदींच गोंधळून जातों. आणि मग मी कांहीं तरी पुटपुटतों—

ही स्त्रीजात म्हणजे कधींही न उलगडणारं एक कोडं आहे!

१२७७३८
१०।९।५२

# ३

# समजूत

हायस्कूलच्या जीवनांतील एक प्रसंग मला आठवतो आणि तो आठवला कीं माझं मलाच हंसूं येतं. कुठचं तरी एक नाटक आम्हीं बसवीत होतों आणि त्या नाटकांतील खलनायकाचं काम माझ्या वांट्याला आलं होतं. आपण तें काम अतीशय उत्कृष्ट करून दाखवूं, असा मला आत्मविश्वास वाटत होता.

....

खलनायकाची कामें उत्कृष्ट करणाऱ्या गाजलेल्या नटांचीं कामें मी पाहिलीं होतीं आणि माझ्या भूमिकेंत मी त्यांची थोडी फार नक्कल उठवून देणार होतों. खलनायकाची भूमिका असली म्हणजे त्याच्या हातांत सिगारेट असलीच पाहिजे, त्यानें मधूनमधून झुरके मारलेच पाहिजेत, आवाजांत मुद्दाम चमत्कारिकपणा आणि शक्य झाल्यास थोडा खवचटपणा आणलाच पाहिजे, अशी माझी ठाम समजूत होती. त्या नाटकांत खलनायकाचे काम मी हे सारे नखरे करीत पार पाडलं. आपलं काम अतीशय उत्कृष्ट झालं, अशा

धुंदींत मी स्टेजवरची शेवटची सिग्रेट संपेपर्यंत होतों. पण मला नंतर कळलं कीं माझं काम साफच पडलं. एवढंच नव्हे तर माझ्या एकट्यामुळें सारं नाटक सपशेल पडलं.......

आपणांमुळें इतकं सुंदर नाटक पडावं, याचं मला तेव्हां अतिशय वाईट वाटलं. पण आज तो प्रसंग आठवला कीं मला मुळींच वाईट वाटत नाहीं. मनांत कांहींतरी समजूत करून घेऊन आपल्या भूमिकेंत सर्व खलनायकांचा अर्क आणण्याचा प्रयत्न केला, याचं मला हसूं येतं. आणि मग तो प्रसंग मनांत घोळवीत बसत मी स्वतःची खूप करमणूक करून घेतों.......

मनुष्याच्या अशा कितीतरी समजुती झालेल्या असतात. आपण असंच बोललं पाहिजे, असंच हंसलं पाहिजे, असंच चाललं पाहिजे, आणि असंच वागलं पाहिजे, अशा कितीतरी समजुती. आपण तसं वागलं नाहीं, तर कांहींतरीच दिसेल व लोक हंसतील, अशी त्याला भीतिही वाटत असते. आपण असं कां करतों, याचा कधींच कोणी विचार करीत नाहीं....

लहानपणापासूनच माझं अक्षर अतीशय वळणदार व मोत्यासारखं होतं आणि अगदीं परवांपरवांपर्यंत त्या सुंदर अक्षराचा मला अभिमान वाटत होता. पण एके ठिकाणीं मी वाचलं कीं मोठ्या लोकांचीं अक्षरं वळणदार नसतात. महात्मा गांधींचं अक्षर वळणदार नव्हतं. मोठमोठया पुढाऱ्यांचीं अक्षरं वेडीवांकडीच आहेत. आमच्या गाजलेल्या साहित्यिकांचीं अक्षरंही बऱ्यापैकीं नाहींत. कविचं अक्षर तर कधींच वळणदार नसतं. पुष्कळदां तें वाचणंही कठीण असतं, आणि तें तसं असणंही स्वाभाविक.

कवाची अक्षरं अशींच असणार. आणि मग मला वाटलं कीं आपलं कांहींतरी चुकतंय. कवींचीं अक्षरं वेडींवाकडीं असतात! आणि मी? माझं अक्षर तर अगदीं व्यवस्थित, सुंदर, रेखीव आणि खोडाखोड तर मुळींच नाहीं. म्हणजे मी अगदींच साधा व्यवहारी माणूस कीं काय? छे! मला नाहीं हें खपायचं—आणि तेव्हां-पासून मी मुद्दाम वेडंवाकडं अक्षर काढण्याचा प्रयत्न करतोंय...

सुंदर तरुणींना वाटतं कीं आपण गडकऱ्यांच्या लतिकेसारखा थिल्लरपणा केला पाहिजे. स्वतःला सभ्य समजणाऱ्या तरुणांना वाटतं कीं आपण शूद्रकाच्या चारुदत्ताची वृत्ति ठेवली पाहिजे. म्हाताऱ्यांना वाटतं कीं आपण पुढच्या पिढीला दोष दिला पाहिजे. कादंबरीकारांना वाटतं कीं आपली दरवर्षीं निदान एक तरी कादं-बरी बाहेर पडलीच पाहिजे. कवींना वाटतं कीं आपण कांहींतरी "नवीन" आणलंच पाहिजे. दिग्दर्शकांना वाटतं कीं नायक-नायिकेची भेट होतांना तेथें चंद्र असलाच पाहिजे व त्यांच्या चुंबनाचा प्रसंग तसाच अर्धवट सोडला पाहिजे. नर्तकांना वाटतं कीं आपण थोडेसे बीभत्स अंगविक्षेप केलेच पाहिजेत. क्रिकेटरला वाटतं कीं आपण टुकुटुकुचा खेळ करून जास्त वेळ काढला पाहिजे. गवयाला वाटतं कीं आपण तोंड वेडंवाकडं केलंच पाहिजे. हॉटेलमधल्या पोरांना वाटतं आपण "चार पैसे" "दोन आणे" वगैरे शब्द अगदीं किंचाळल्यासारखे म्हटले पाहिजेत. मोटारच्या ड्रायव्हरना वाटतं कीं प्रत्येक ठिकाणीं मोटार थांबवून आपण उतरलें पाहिजे व थोडासा वेळ अदृश्य होऊन उतारूंना आपल्या अस्तित्वाची जाणीव करून दिलीच पाहिजे.

लोकल गाडींतून प्रवास करणाऱ्यांना वाटतं कीं आपण फुटबोर्डावर उभं राहून लोंबकळतच प्रवास केला पाहिजे. आणि फास्ट लोकल गाडीच्या ड्रायव्हरला वाटतं कीं प्रत्येक स्टेशनांतून आपण किंचाळतच गेलं पाहिजे !

आणि अशा कितीतरी समजूती असल्यानं माणूस खरोखरीं जसा आहे, तसा तो मुळींच वागत नाहीं. कसल्यातरी खोट्या समजुती त्यानें करून घेतलेल्या असतात आणि त्याच्या आयुष्यांत तो ठराविक प्रसंग आला कीं तो तसा ठरल्याप्रमाणें वागतो. त्याचं स्वतःचं असं कांही नसतंच.

डार्विनचं म्हणणं खरं आहे तर !

# ४

# वाटावं लागतं—

मुंबईच्या गर्दीचा प्रश्न कसा सोडवावा, याबद्दल एकानें केलेली सूचना मी नुकतीच एका दैनिकांत वाचली. निरनिराळीं ऑफिसीस जीं फक्त फोर्ट विभागांत केंद्रित झालेलीं आहेत, तीं मुंबईच्या निरनिराळ्या भागांत न्यावींत, असं त्याचं म्हणणं. त्यानं केलेल्या या सूचनेचं स्वागतही खूप झालं. पण ती योजना प्रत्यक्ष अंमलांत आणली, तर त्याला किती लोक स्वखुषीनें तयार होतील, याबद्दल मला जबरदस्त शंका आहे.

त्या योजनेला निदान मी तरी तयार नाहीं. ऑफिसला कल्याण किंवा विरारपासून येणारे लोक हजारों आहेत. आपणाला ऑफिस फार दूर पडतं, खूप त्रास पडतो, अशी तक्रार ते जरूर करतील. यावर उपाय काय असं विचारलं तर ते म्हणतील कीं खुद्द मुंबईतच कुठेंतरी रहायची आमची सोय करा. पण त्यांना सांगितलं कीं ऑफिसच इथें जवळपास कुठें तरी आणतों, तर ते त्या गोष्टीला तयार होणार नाहींत. "ऑफिस जवळ आहे" या कल्पनेच्या

आहारीं जाऊन कांहीं लोक तयार झालेच तर ते चार आठ दिवसांत म्हणूं लागतील, "छे बुवा! ती मजा गेली. आपण ऑफिसमध्यें जात आहोंत आणि तेथें काम करीत आहोंत, असं कांहीं आतां वाटत नाहीं." आणि तसं कांहीं वाटत नाहीं, म्हणूनच त्यांतील मौज गेली!

ऑफिसें निरनिराळ्या भागांत हालवावीं ही सूचना मान्य केली कीं फोर्ट कुलाब्यामधील सर्व ऑफिसें उपनगरांपर्यंत पसरतील. सायनला रहाणाऱ्या मला नोकरीला जावं लागेल दादरला किंवा कुर्ल्याला किंवा तिकडे सांताक्रुझला. दादरला रहाणाऱ्या मुलींनीं नोकरी करायची तीही दादरलाच कुठेंतरी. दुसरा कोणी नोकरीला भायखळ्याला तर आणि कोण माटुंग्याला, नाहींतर परळला, फार फार तर ग्रँट रोड किंवा गिरगांवपर्यंत आणि अगदीं कांहीं नेमकींच ऑफिसें फोर्ट विभागांत.

मला स्वत:ला ही योजना बिलकुल पसंत नाहीं कारण आपण ऑफिसमध्यें जात आहोंत, असं मला वाटावं लागतं. अर्धातास गाडींतून लोंबकळत जायचं, चर्चगेट स्टेशनमधून बाहेर पडल्यावर धांवपळ करायची आणि साडेदहाचा ठोका गांठायचा. हें सारं कितीही त्रासदायक असलं तरी मला तें खूप आवडतं. खाकोटींत पर्स घेतलेल्या आमच्या मराठी महिलांची आणि आपला वक्षभाग जास्त पुष्ट दाखविण्याकरितां कृत्रिम साधनें वापरणाऱ्या आंग्ल युवतींची मला खूप मौज वाटते. राजाबाई टॉवरला साक्षी ठेवून टोलेजंग बंगल्यांकडे पाहात ऑफिसकडे जाण्यांत मला कसला तरी विलक्षण आनंद होतो. आणि आपण ऑफिसांत जात आहोंत, असं वाटूं लागतं. ऑफिसमध्यें काम करतांनाही समोरच ताजमहाल

हॉटेल आहे, शेजारींच गेट-वे ऑफ इंडिया आहे. मुख्य म्हणजे आपण कुलाबा विभागांत आहोंत, असं मला सारखं वाटत असतं.

आणि मला वाटतं, तें तसं वाटलंच पाहिजे. जिवाची खूप धांवपळ करून आपण ऑफिसपर्यंत आलों आहोंत आणि ऑफिस म्हणजे कांहींतरी निराळं आहे, असं वाटणं अतिशय जरूरीचं आहे. प्रत्येकाच्या मनांत ही इच्छा असतेच. आपण कांहीं ऑफिसांत नाहीं, असेच आपण कुठेंतरी आहोंत, असं माणसाच्या मनांत आलं कीं मग त्यांत कांहींच स्वारस्य रहात नाहीं. त्यामुळं आपलं ऑफिस दूर कुठेंतरी असावं, असं त्याला वाटत असतं.

जुन्या पद्धतीनें लग्न करीत त्यांत दोन तीन दिवस ताशांचं आणि सनईचं संगीत चाललेलं असायचं. लग्नाच्या एकंदर गोंधळांत वाद्यांची आणखी ही एक कटकट कशाला, हें मला अगदीं परवांपर्यंत कळत नव्हतं. पण कालच माझ्या डोक्यांत प्रकाश पडला. आपलं लग्न आहे, असं वधूवरांना वाटलं पाहिजे. ताशांच्या आवाजानें त्यांचीं हृदयें आणि शरीरें कंप पावलीं पाहिजेत आणि सनईच्या आवाजानें त्यांची कसली तरी गोड समाधी लागली पाहिजे. वधूवरांच्या नातेवाईकांना वाटलं पाहिजे कीं कांहींतरी विशेष चाललं आहे, हो, लग्न आहे! गोळा झालेल्या शेंकडों मुलांना वाटलं पाहिजे कीं कांहींतरी निराळा प्रकार दिसतोय. वाद्यें नसलीं तर त्यांना लग्न आहे, असं वाटणारही नाहीं! नवऱ्यामुलाच्या आईला वाटलं पाहिजे कीं-आपल्याला आतां सून येणार, इतक्या दिवसांची मनीषा साकार होणार! आणि अशा या महत्त्वाच्या प्रसंगीं ताशांचा कडकडाट आणि सनईचा किणकिणाट पाहिजेच! लग्न आहे असं वाटलं पाहिजे ना?

कोंकणांतील आमच्या एकुलत्या एक कॉलेजची लोक चेष्टा करीत आणि कांहीं प्रमाणांत आजही करतात. त्या कॉलेजला कॉलेज न म्हणतां शाळा म्हणतात ! पण शाळा म्हणणाऱ्यांची कांहीं एक चूक नाहीं. कॉलेज म्हणून जें वाटावं लागतं तें वाटत नाहीं, एवढं खास. मोठी टोलेजंग इमारत, कॉलेज कुमारांचा गोंधळ आणि कुमारिकांचा कुजबुजाट, भपकेबाज कपडे यापैकीं त्या कॉलेजांत कांहींही नाहीं. कॉलेजांत मुलं येत तीं हाफपँट किंवा फार फार तर लेंगा घालून. मुली येत त्या नऊवारी नेसून. आणि त्यामुळेंच त्या कॉलेजचा शिक्षणाचा दर्जा कितीही उच्च असला तरी कॉलेज म्हणून जें वाटावं लागतं, तें तेथें वाटत नाहीं !

माणसाची वृत्ति किती चमत्कारिक असते पाहा ! आपण एखादी गोष्ट करतों आहोंत, असं त्याला वाटावं लागतं. आणि त्याला तसं वाटलं नाहीं तर त्याला कांहींच स्वारस्य वाटत नाहीं.

काय एकएक गंमत तरी !

५

# शनिवार, रविवार आणि स-स-सोमवार !

आठवड्यांतील सारे दिवस सारखेच खरे, पण निरनिराळ्या दिवसांची आपण निरनिराळ्या कारणासाठीं वाट पहात असतों, हें देखील खरंच नाहीं का? एखाद्या वाराची अतिशय भीति वाटत असते व तो न येईल तर बरा, असं वाटूं लागतं. पण तो दिवस येतो अन् निघून जातो. मग पुढच्या आठवड्यांतल्या त्या दिवसाच्या कल्पनेनं भीति वाटूं लागते. एखाद्या वाराची आपण अतिशय उत्कंठेनें वाट पहात असतों आणि तो येऊन केव्हां गेला हें कळतही नाहीं.

घातवार घातवार म्हणून लोक शनिवारची कितीही निंदा करोत, मला शनिवारबद्दल अतिशय आकर्षण वाटतं. शनिवार केव्हां येतो, याची मी सारखी वाट पहात बसतों. सोमवार, मंगळवार बुधवार आपल्या ठराविक चाकोरींतून मंद पावलें टाकीत गेले कीं

मग गुरुवार येतो. आठवड्यांतील अर्धा भाग संपून आपण दुसऱ्या भागांत प्रवेश करीत असतों याचा आनंद तर असतोच, पण त्यापेक्षां जास्त आनंद आतां शनिवार अगदीं हाताशीं आला, या कल्पनेचा असतो. आज गुरुवार, उद्यां शुक्रवार आणि मग आलाच कीं शनिवार, या विचारानें गुरुवार कांहींसा आनंदांत जातो. शुक्रवार आला कीं आतुरता जास्त जास्त वाढूं लागते आणि उद्यांच शनिवार या कल्पनेनं व शनिवारला जोडून लगेच रविवार या विचारानें शुक्रवार पुष्कळसा सुसह्य वाटतो.

मराठी शाळेत असतांना आम्हीं दर शुक्रवारीं "शुक्रवार" करायचे. हा "शुक्रवार" शुक्रवारींच कां करायचा इतर कोणत्याहीं वारीं का नाहीं हा त्यावेळीं माझ्यापुढें मोठा प्रश्न होता. त्यावेळीं मी तो बोलूनही दाखविला होता. पण मला माझ्या प्रश्नाचं उत्तर मिळालं नव्हतं. "अगदीं कांहींतरी प्रश्न" म्हणून आमच्या त्या वेळच्या बाईनीं माझ्याकडे चमत्कारिक दृष्टिक्षेप केलला मला आजही स्मरतो....

पण शुक्रवार "शुक्रवारीं"च कां करायचा, याचं उत्तर आज मला मिळालं आहे. आणि त्या दिवशींच तो केला पाहिजे असा माझा आज आग्रहही आहे. आठवड्यांतले खरे दिवस सहा–त्यापैकीं पहिले चार दिवस निघून गेले आणि शुक्रवार आला. नंतर शनिवार येणार व मग लगेच रविवार. या शनिवार–रविवारचें स्वागत नको का करायला? शनिवार रविवारचें स्वागत करण्याच्या हेतुनेंच "शुक्रवार" ची पद्धत पडली. चार पांच दिवस काम करून शिणलेलं आपलं मन आणि शरीर शनिवार–रविवार येणार म्हणून त्यांच्या स्वागता साठीं तयार करून ठेवायचं–त्याकरितां शुक्रवारीं चणेचुरमुरे खायचे; अस

त्यास कॉफी प्यायची आणि गाणीं, नकला, नृत्य यांत रममाण होऊन शनिवार रविवारच्या आगमनाची जय्यत तयारी करून ठेवायची !

आणि नंतर लगेच शनिवार येतो. ज्या दिवसाची मी अतिशय उत्कंठतेनें वाट पाहात असतों, तो शनिवार एकदांचा येतो. आज शनिवार या कल्पनेनेंच मीं बेभान होऊन जातों आणि आज काय करूं अन् काय नको, असं होऊन जातं. शनिवारीं ऑफिस अर्धा दिवसच असतं व दुपारीं दोन वाजतांच आम्हीं मोकळे होणार असतों. संध्याकाळचा कुठचा तरी सुंदर शो मी गांठणार असतों किंवा दूर कुठेंतरी फिरायला जाणार असतों. रात्रीं एखाद्या मैफलीला जाणार असतों किंवा दूर कुठेंतरी मित्र गोळा करून गप्पांचा बेत जमविणार असतों. कांहीं झालं तरी शनिवारीं रात्रीं लवकर झोंपायचं नाहीं, हें माझं ठरलेलं असतं. त्यामुळें गेलीं कित्येक वर्षं शनिवारीं रात्रीं बाराच्या पूर्वीं मी झोंपीं गेलेला, मला आठवत नाहीं—

शनिवारबद्दल मला आकर्षण वाटण्याचं आणखी एक कारण आहे. कॉलेजमधील इंटरचं माझं वर्ष मी जवळजवळ गप्पांतच घालविलं. इंटरच्या वर्षीं दर शनिवारीं आम्ही तीन चार मित्र एका ठिकाणीं गोळा व्हायचे आणि आमच्या गप्पांना असा कांहीं ऊत यायचा कीं इतरांना हेवा वाटावा. शनिवारीं "रात्र संपली तरी पण गोष्टी संपल्या नव्हत्या" अशी आमची कित्येकदां अवस्था झाली होती. गप्पा मारतांना हास्याचे असे कांहीं फवारे उडायचे आणि परस्परांच्या सुखदुःखांत, आम्हीं इतके रममाण व्हायचे कीं आम्हांला कशाचंच भान रहायचं

नाहीं. त्या जीवनांत शनिवारची मी केवढ्या आतुरतेनें वाट पाहात असायचा........

ते शनिवार आज गेले असले तरी आजही शनिवार येतातच. त्या पूर्वस्मृतींनें माझं हृदय उचंबळून येतं. आतां दर शनिवारीं रात्रीं मी त्यांतला एक एक प्रसंग मनांतल्या मनांत घोळवीत बसतों.

मी लहान होतों तेव्हां दर शनिवारीं आईबरोबर मी मारुतीच्या देवळांत जायचा. दर शनिवारीं घरून मारुतीला एक नारळ नेण्याचं काम माझ्याकडे होतं. देवळांत गेलं कीं मारुतीला तीनचार प्रदक्षिणा घालायच्या. भटजींनीं दिलेलं खोबरं खायचं. नंतर आईबरोबर गांवांत कोणाच्याकडे तरी जायचं व मला तेथें हटकून खाऊ मिळायचा. छोटे छोटे खेळगडी मला तेथें मिळायचे व मग मीं तेथेंच रहायचा हट्ट करायचा. पण आई घरीं परत यायला निघाली कीं मी मग बोकांड पसरायचा व मग आई मला उचलून घरीं घेऊन यायची— ते दिवस परत येणं आतां कदापि शक्य नाहीं.

शनिवारच्या अशा कितीतरी स्मृति शनिवारच्या निमित्तानें माझ्या मनांत जागृत होतात. ते शनिवार गेले, पण त्याहीपेक्षां रम्य शनिवार पुढें येतील, या आशेवर मी आणखी कांहीं वर्षांनंतर येणाऱ्या शनिवारांची वाट पहातोंय........

शनिवार नंतर रविवार येणार असतो आणि शनिवारीं अर्धीच सुट्टी असली तरी रविवारीं पूर्ण सुट्टी असते. रविवारीं माझा मी पूर्ण

मुखत्यार असतों आणि मनांत येईल तें करणं मला त्या दिवशीं शक्य असतं. उद्यां आपणांला पूर्ण स्वातंत्र्य ही कल्पना सतत मनांत असल्यानें शनिवारीं आपण कांहींशा बेपर्वाईनें वागत असतों. या सर्वांमुळें शनिवारबद्दल मला अतिशय आकर्षण वाटत असतं व मी त्याची अतिशय उत्कंठतेनें वाट पाहात असतों....

रविवार हा दिवस आठवड्यांत बसत नाहीं, तो दिवस मोफत मिळालेला आहे आणि म्हणून तो सर्वस्वीं फुकट घालविणें हाच खरा उपयोग, या विचारसरणीशीं मी पूर्ण सहमत आहे. कोणत्याही रविवारीं कांहीं विशेष कार्य केलेलं मला स्मरत नाहीं. रविवारचा दिवस जातो चहा आणि गप्पांत....

रविवारची संध्याकाळ जसजशी येऊं लागते तसतसा मी अस्वस्थ होऊं लागतों. उद्यां सोमवार या कल्पनेनं मला भीति वाटूं लागते. शनिवार–रविवार निघून गेले आणि उद्यांपासून पुन्हां त्या ठराविक चाकोरींत काम करायला सुरुवात करायची. सोमवार, मंगळवार, गुरुवार, शुक्रवार...पांच दिवस. शनिवार यायला पूर्ण पांच दिवस शिल्लक. रेल्वेचें तेंच स्टेशन, गाडींत दिसणारे तेच ठराविक चेहेरे, रस्त्यांत भेटणाऱ्या त्याच त्याच मुली, त्याच इमारती, तेंच ऑफिस, आणि ऑफिसांतले तेच तेच चेहेरे. असे पांच दिवस काढायचे असतात, तेव्हां कुठें शनिवार दृष्टीस पडतो.

कॅलेंडर वरून सर्व सोमवार काढून टाकावेत, असं मला वाटूं लागतं. पण आपल्या सोयीचं नवं कॅलेंडर करणं आपल्याला शक्य

नसतं. दर आठवड्याला सोमवार येतोच. चंद्राला किंवा सूर्याला ग्रहण लागण्यापूर्वी वेध लागतात म्हणे! सोमवार येण्यापूर्वी रविवारीं संध्याकाळपासून असेच वेध लागतात. पण त्याला इलाज नसतो.

सोमवार येतो आणि मंद पावलें टाकीत निघून जातो. एक दिवस गेला, उद्यां दुसरा जाईल, असा मनाशीं कांहींतरी विचार करीत मी मग शनिवारची वाट पाहात बसतों......

## ६

# टाळी

तुमचा उत्साह अगदीं अनिवार होऊन तुम्हीं तुमच्या मित्राच्या हातावर कधीं टाळी दिली आहे का ? तुमच्या मित्रानें तुमच्या हातावर टाळी देऊन तुमचा हात कधीं दुखावला आहे का ? दुसऱ्याच्या हातावर टाळी देतांना त्यानें आपला हात अलगद काढून घेतल्यामुळें तुमचा हात कधीं टेबलावर जोरानें आपटला आहे का ? आपल्यापेक्षां वरच्या पातळीच्या लोकांजवळ गप्पा मारतांना तुम्हीं टाळी द्यायला हात वर केल्यावर त्यांनीं आपला हात दुसरीकडेच नेल्यामुळें तुमची कधीं अगदींच "ही" झाली आहे का ? सभेंत भाषण करतांना अगदीं खास टाळीच्या वाक्यावरही टाळी पडली नाहीं, असं कधीं झालं आहे का ? टाळी द्यायचं ठरलेल्या लोकांनीं कधीं ऐनवेळीं दगा दिला आहे का ? किंवा तुम्हीं भाषणाला उभे रहातांच टाळ्यांचा न संपण्याइतका कडकडाट कधीं झाला आहे का ? लयबद्ध टाळ्या मारून तुम्हीं मुलांना खेळवलं आहे का ? किंवा आपल्या मैत्रिणीपुढें टाळीकरितां हात पुढं केल्यावर तिनें म्हटलेलं "इश्श" तुम्हीं ऐकलं आहे का ?

* * *

कॉलेजमध्यें एकदां डिबेटिंग होतं. स्त्रियांचं खरं कार्यक्षेत्र चूल आणि मूल हेंच आहे, असं मी मोठ्या तावातावानें प्रतिपादन करीत होतों. मम्मटापासून तों मर्ढेकरांपर्यंतच्या लिखाणांतील दाखले देऊन मी माझ्या विधानांना पुष्टि आणीत होतों. आपल्या या भाषणाला चार पांच वेळां तरी टाळ्या पडणार, याची मला खात्री होती. पण एकही टाळी पडेना. आतां टाळी पडेल, मग टाळी पडेल, अशी मी सारखी वाट पाहात होतों. एखादं वाक्य मुद्दाम दोनदां म्हणत होतों. आवाज चढवून पाहिला. हातवारे करून झाले. माझ्याकडून शक्य होते तितके सर्व प्रयत्न करून झाले. पण टाळी पडेचना ! टाळ्यांचं तंत्र कांहीं औरच असतं !

*　　*　　*

दुसरा प्रसंग आहे एका ऐतिहासिक नाटकांतला. मोंगलांच्या तावडींत सांपडलेल्या एका हिंदू युवतीला सोडवून आणणाऱ्या हिंदू सरदाराचं काम मी केलं होतं. माझ्या तोंडीं अशीं कांहीं वाक्यें होतीं कीं प्रत्येक वाक्याला टाळ्या पडणार, याची मला खात्री होती. तरीही शंका नको म्हणून मी माझ्या पदरची कांहीं वाक्यें त्यांत घुसडून दिलीं होतीं. इतकंही करून टाळ्या पडल्या नाहींत तर काय घ्या, म्हणून टाळ्या देणारीं माणसेंही मी तयार केलीं होतीं. प्रत्येक टाळीला एकएक सिंगल चहा देण्याचं ठरलं होतं. पण काय गंमत पाहा ! आजपर्यंत कधींही न पडलेली मिशी पटकन गळून पडली. टाळ्यांचा कडकडाट झाला ! थोड्याच वेळांत दाढीही पडणार असं वाटल्यावरून मी शहाणपणाचा विचार केला— " अरे, ड्रॉप

टाका ! " आणि ड्रॉप पडल्यावर टाळ्यांचा असा कांहीं कडकडाट झाला कीं तो आजही माझ्या कानांत घुमतोय.

* * *

मुंबईला रहाण्याचे कांहीं ठराविक नियम आहेत आणि ते पाळणें हें प्रत्येक मुंबईकराचें कर्तव्य आहे. त्यापैकीं एक नियम मोठ्यानें न बोलणें व शेजाऱ्यांना शक्य तितका कमी त्रास देणें, हा आहे. निदान आम्हीं तरी हा नियम अगदीं कसोशीनें पाळीत असतों. गार्डीतील डब्यापासून तों चाळींतील नळापर्यंत आम्हीं अगदीं ठरविलेलं आहे कीं आपल्या बोलण्यामुळें दुसऱ्यांना त्रास होऊं द्यायचा नाहीं. याचमुळें आमच्याकडे अशी पद्धत पडली आहे कीं सकाळचा पहिला चहा झाला कीं त्या चहा करणारानें टाळी मारायची, हांक मारायची नाहीं. ठराविक लयबद्ध त्या टाळ्या ऐकल्या कीं बाकीच्यांनीं उठायचं. आतां तर संवयीनें असं झालंय कीं सकाळच्या तीन मधुर टाळ्या ऐकल्या नाहींत तर अगदीं चुकल्या-चुकल्यासारखं वाटतं. चहा झाल्यावर टाळ्या देण्याच्या या पद्धतीला आमचे शेजारी हंसतात. बाहेरचा कोणी पाहुणा आला तर तोही हंसतो. तरीदेखील सकाळच्या चहाच्या टाळ्या बंद करायला आम्हीं मुळींच तयार नाहीं !

एका हातानें टाळी वाजत नाहीं म्हणतात. दोन हातांचं गोड सहकार्य म्हणजे टाळी. दोन व्यक्तींची टाळी म्हणजे तसंच संपूर्ण सहकार्य, प्रेमाचा परिचय, आनंदाचा अतिरेक आणि नाजुक नातं !

# ७

# भजीं

कॉलेजमधील संस्कृतच्या एका प्रोफेसरांची मला अतिशय मौज वाटते. मेघदूत किंवा शाकुंतल शिकविण्यांत स्वारी अगदीं तल्लीन होऊन जायची. कालिदासाच्या काव्यमाधुर्याची ते स्तुति करायचे आणि वर्णनाचे गोडवे गायचे. आणि एकंदर लेक्चर इतकं सुंदर रंगवायचे कीं पुढच्या बांकावरच्या कॉलेजकुमारिकांकडे देखील कोणाचं लक्ष जात नसे. या प्रोफेसरांना बोलतांना हातवारे करायची भारी संवय होती आणि या हातवाऱ्यामुळें आपलं लेक्चर जास्त परिणामकारक होतं, असा त्यांचा दावाही होता.

पण या हातवाऱ्यांचें खरें रहस्य काय आहे हें कळायला आम्हांला विशेष वेळ लागला नाहीं. कोणींतरी बातमी आणली कीं शेजारच्या हॉटेलमधून ते दररोज चार आण्यांचीं भजीं आणतात आणि कॉलेजमध्यें द्याव्या लागणाऱ्या दोन लेक्चर्सनां तीं पुरतात. व्याख्यान अगदीं ऐन रंगांत यावं, इतक्यांत त्यांनीं एखादी मिस्किल कोटी करावी, मुलांनीं हास्याचे सात मजले उभारावेत, कांहींनीं

हातपाय आपटून मोठ्यानें आवाज करावा, मुलींनीं हंसत लाजत आणि मुरके मारीत माना खालीं घालाव्या आणि इकडे आमच्या प्रोफेसरमहाशयांनीं चटकन् तोंडांत एक भजं टाकून पुन्हां आपलं अगाध आणि विद्वत्ताप्रचुर वक्तव्य सुरू करावं—

कॉलेजमधील प्रोफेसरांचं वैशिष्ट्य लक्षांत घेऊन त्यांचं आम्हीं नामाभिधान करीत असूं व पुढं ते त्याच नांवानें ओळखले जात असत. पण या संस्कृतच्या प्रोफेसरांना भज्यांवरून कांहीं नांव द्यायचं कोणाच्या मनांतही आलं नाहीं. भजींनाथ, भजींपति अशीं कितीतरी नांवें आमच्या मनांत घोळत होतीं. तरी आम्हीं त्यांतलं एकही नांव चार लोकांत उच्चारलं नाहीं. कारण त्यांच्या-बद्दल आम्हांला आदर वाटत होता, आपलेपणा वाटत होता...

माझ्या अनेक प्रकारच्या लोकांशीं ओळखी झाल्या असल्या तरी त्यापैकीं कांहींचेच अवशेष माझ्या जीवनांत आहेत आणि त्या संस्कृतच्या प्रोफेसरना त्यांत मानाचं स्थान आहे. कारण त्या वर्षापासून मी भजीं खाऊं लागलों. आणि कांहीं दिवसांतच मला भज्यांशिवाय कांहींच गोड लागेनासं झालं.......भजीं खाऊं नयेत, तीं तेलकट असतात, प्रकृति बिघडते वगैरेसारख्या उपदेशाच्या घोटांनीं दाबून ठेवलेलं माझं मन एकदम उफाळी मारून वर आलं आणि तेव्हांपासून मी भजीं खातोंय—अगदीं भजींच भजीं—

आमच्या घराच्या भोंवतीं दोनतीन हॉटेलें होतीं, आणि त्यांतून सकाळ संध्याकाळ भज्यांचा सुगंध दरवळत असायचा. त्या वेळेला मला भज्यांचा इतका तिटकारा वाटत असे कीं मी शेजा-

ऱ्च्या हॉटेलवाल्यांना शिव्या मोजायचा आणि काँग्रेस सरकार भजीं विकायला बंदी कां करीत नाहीं याचा विचार करायला लागायचा. पण आज कधीं मी घरीं गेलों आणि भज्यांचा तो घमघमाट सुटला कीं मी वेडावून जातों, बेभान होतों, आणि मग आईनें मुद्दाम केलेल्या गोडधोड पक्वान्नांपेक्षां मला तीं भजींच अधिक गोड लागतात. लहानपणीं मी किती खुळा होतों याचा मी विचार करूं लागतों.

माझ्या मित्रांनीं एकदां लहानशी फीस्ट करण्याचं ठरविलं आणि फीस्टकरितां काय करायचं तें ठरविण्याचं काम माझ्याकडे आलं. मी ऑर्डर दिली ती भज्यांची आणि चहाची. स्वतःला सात्विक अन् सद्भिरुचिचे समजणारे माझ्यावर चिडलेही—

पण मग रात्रीं आम्हीं एका खडकावर बसलों. अगदीं मर्क्युरी-लाईटसारखं चांदणं पडलं होतं. गप्पांना आणि हंसण्याखिदळ-ण्याला अगदीं ऊत आला. गायन झालं, नर्तन झालं, नकलाही झाल्या. आणि मग आम्हीं खुसखुशीत आणि चुरचुरीत भजीं खायला सुरुवात केली. भज्यांबरोबरच आमच्या गप्पांचा खुशखुशीतपणा वाढत गेला आणि मग चहा झाला तेव्हां तर अगदीं सार्थक झाल्या-सारखं वाटलं.

तारुण्याच्या ऐन सीमेवर माणूस आला कीं तो बावचळतो म्हणतात. त्याचं लक्ष भलतीकडेच जाऊं लागतं. स्वतःच्या दाढी-मिशीची तो इतकी फाजील काळजी घेऊं लागतो कीं एखादा निष्णात कलावंतही मागें पडावा. त्याच्या कपड्यांविषयीं तर बोला-

यळाच नको. आणि सर्वांत म्हणजे तो तरुण स्त्रियांकडे आशाळ-भूतपणानें पाहूं लागतो आणि या तारुण्यांतच तो भजीं खायला सुरुवात करतो.

माझ्या मतें भजीं खाणें हें तारुण्याचं खास लक्षण आहे. विशी येईपर्यंत भज्यांची लज्जत कळण्याइतकी स्थिति आलेली नसते आणि तारुण्य उलटून गेलं कीं भजीं खाऊं नयेत, असं वाटू लागतं. पण ज्यांच्या अंगीं तारुण्य मुसमुसतंय, ते भजीं खातातच खातात. कांहीं म्हातारेदेखील अतिशय आवडीनें भजीं खातात, अगदीं तरुण खातात तशीं. याचा अर्थ असा कीं ते जरी वयानें म्हातारे झाले असले तरी त्यांचं तारुण्य अद्याप संपलेलं नसतं.

माझ्या पत्नीचं माझ्यावर अतिशय प्रेम आहे आणि माझी कोणतीही छोटी विनंती देखील तिनें आजपर्यंत झिडकारलेली मला आठवत नाहीं. तिला भजीं कर म्हणायचा अवकाश कीं किंचि-तही आढेवेढे न घेतां ती तयारीला लागायची आणि मग मी उगीचच तिला मदत करायला लागायचा. आणि भज्यांचा पहिला घाणा ताटांत पडला कीं मी तीं अधाशीपणानं खायला लागायचा. तिनें केलेलीं हीं भजीं मला अतिशय आवडायचीं. पण ह्या भज्यांना हॉटेलच्या भज्यांची टेस्ट येत नाहीं हें मात्र खास. हॉटेलमधल्या भज्यांची लज्जत कांहीं औरच !

भजीं निरनिराळ्या प्रकारचीं आणि अनेक तऱ्हेचीं करतात. पण त्या सर्वांत अग्रपूजेचा मान कांद्याच्या चुरचुरीत भज्यांकडेच जातो. भज्यांचे आकारही निरनिराळे असतात. त्यांच्या आकारा-

बद्दल माझा विशेष आग्रह नसला तरी तीं किंचित काळसर रंगाचीं आणि अगदीं खडबडीत अंगाचीं असावींत, अशी माझी मनांतील इच्छा असते. लठ्ठ माणसांप्रमाणेंच लठ्ठ भज्यांचा मला तिरस्कार वाटतो.......

आजही माझ्या मनांत तें स्वप्न पुन्हां पुन्हां घुटमळतंय आणि तें पुन्हां एकदां प्रत्यक्षांत केव्हां अवतरेल याची मी वाट पाहातोंय.

"मग रात्रीं आम्हीं एका खडकावर बसलों. अगदीं मर्क्युरी-लाईटखारखं शुभ्र चांदणं पडलं होतं. गप्पांना आणि हंसण्या-खिदळण्याला अगदीं ऊत आला. गायन झालं, नर्तन झालं, नक्कलाही झाल्या. आणि मग आम्हीं खुसखुशीत आणि चुरचुरीत...."

# ८

# शेवट

शेवट, मग तो कोणत्याही लेखन प्रकाराचा असो, कठीणच. पण त्यांतल्या त्यांत लघुनिबंधाचा! दुसरा कोणताही वाङ्मयप्रकार लिहायचा म्हटला तर त्याची सुरुवात कशी करायची, विषय कलात्मकरीत्या कसा हाताळीत न्यायचा आणि शेवट कसा गांठायचा, हें आधीं ठरलेलं असतं. कादंबरीकाराला तर आपल्या कादंबरीचा शेवट करणें फार सोपं असतं. कारण कादंबरींची खरी गोडी कांहीं त्या "शेवट"वर अवलंबून नसते. कादंबरीचे वाचक पाहातात त्या इतर गोष्टी. विषय हाताळण्याची पद्धत, चरित्र-चित्रण, संवाद वगैरे. नाटकाचेंही असंच आहे. रुबाबांत सुरुवात केली आणि नाटक एकदां रंगत चाललं कीं नाटककाराचें काम पुष्कळसं संपल्यासारखं होतं. आपल्या नाटकाचा शेवट कसा होत आहे याबद्दल त्याला विशेष काळजी करावी लागत नाहीं. नायक-नायिकेचं मीलन होतं, खलनायक शरमिंदा होतो आणि इतर पात्रांना खेद, किंवा हर्ष किंवा पश्चात्ताप यापैकीं कांहींतरी होतं. तें तसं होणार हें अगोदर

ठरलेलं असनं. नाटककाराला आपला शेवट साधण्याकरितां विशेष खटाटोप करावा लागत नाहीं, तो याच कारणामुळें.

एखादा विद्वत्ताप्रचुर लेख लिहायचा झाला तर शेवट करणें सोपं असतं. "सारांश" असं म्हणून कांहींतरी वाक्यें खरडवणें फार सोपं असतं. अग्रलेखाच्या शेवटीं "असं होण्याचा संभव दिसतो" "असं न होवो म्हणजे मिळवली" किंवा "अशी अपेक्षा आम्हीं करावी काय" वगैरे सारखी कांहीं तरी मखलाशी करून निबंध संपवितां येतो. पण लघुनिबंधकाराची गोष्ट वेगळी.

माझ्या विषयीं म्हणाल तर मला शेवटच करणं कठीण जातं. प्रो. फडक्यांनीं लघुनिबंधाला गुजगोष्ट म्हणून संबोधिलं. लघु-निबंधाच्या तंत्राबद्दल ते म्हणतात, " अंतरंगांतल्या मित्रमंडळींशीं गप्पा मारतांना जो मनमोकळेपणा आपण स्वीकारतों तो स्वीकारून निबंधकारानें लिहिलें पाहिजे." अशा तऱ्हेनें लघुनिबंध म्हणजे मित्रांशीं मारलेल्या गप्पा हें निश्चित झाल्यानंतर गप्पा मारतांना ज्या ज्या अडचणी येतात, त्या सर्व लघुनिबंध लिहीतांना येतात. लघुनिबंधाची सुरुवात सहज होऊन जाते.

आमचीं रात्रीचीं जेवणें झालीं आणि मग आम्हीं आपल्या मित्रांना हांका मारल्या. हांकेची वाटच पाहात होता असा एक मित्र हांकेसरशीं धांवत आला आणि तो आल्याबरोबर गप्पांना सुरुवात झाली. गप्पा कोणत्या विषयावरून सुरू झाल्या तें आम्हांला कळलंही नाहीं.....निदान मला तरी लघुनिबंधाचीही सुरुवात करणं मुळींच कठीण वाटत नाहीं.

आतां पुढची गंमत पाहा. माझा एक एक मित्र गोळा होऊं लागला आणि सात आठ जणांचं टोळकं इथें केव्हां जमा झालं, हें मला कळलंही नाहीं. आणि आमच्या गप्पांचा प्रवाह कुठें कुठें आणि कसा कसा वाहात गेला, हेंही मला कळलं नाहीं. तरी-पण या गप्पांत एक मध्यवर्ती विषय होता आणि बाकीचे सारे विषय येत ते त्या मध्यवर्ती विषयाला हळूच स्पर्श करून जात. आमच्या या गप्पांत इकडच्या तिकडच्या गप्पा खूप झाल्या, विनोदाचे फवारे उडाले, त्यांत क्वचित करुणरस आला. पण त्या सर्वांमुळें गप्पांची गोडी कितीतरी पटींनीं वाढली, हें निश्चित.

पण काय गंमत पाहा! पूर्णिमेची रात्र असली तरीही चंद्र पश्चिम क्षितिजाकडे झुकलेला दिसतोय. हवेंत जास्त गारवा आल्या-सारखा भासतोय. मधून मधून येणाऱ्या जांभयांनीं फारच उशीर झाल्याची चांगलीच जाणीव होत्येय. आतां गप्पा पुरत, आतां झोंपूंया, असं प्रत्येकाला वाटतंय. पण गप्पा थांबवायला कोणीच तयार नाहीं! माझ्यापुढें प्रश्न आहे कीं या गप्पा संपवायच्या तरी कशा आणि कुठें ?

आणि लघुनिबंध लिहितांनाही माझं असंच होतं. सुरवात पटकन होते. विषयाभोंवतीं कलात्मक रीत्या पिंगा घालण्यांत मला विशेष परिश्रम घ्यावे लागत नाहींत. पण शेवट करायची वेळ आली कीं मी अडखळतों. काय लिहावं, तें सुचत नाहीं. एखादं वाक्य लिहून मोकळं व्हावं असं एकदां वाटतं आणि मी तें लिहूनही टाकतों. पण नंतर वाटूं लागतं कीं छे! हें वाक्य साफच चुकलं. दुसरं कांहीं

तरी जरा बऱ्यांपैकीं वाक्य घालायला पाहिजे होतं. मग मी तें वाक्य खोडून टाकतों आणि दुसरं कांहीं सुचतंय का म्हणून उगाच डोकं खाजवूं लागतो. मला लघुनिबंधाचा शेवट जमत नाहीं हेंच खरं !

आतां याच निबंधाचं पाहा ना. विषय सुचला तसा मी भराभर लिहीत गेलों. आतां येथें थांबलंच पाहिजे, असं मला वाटतंय. पण याचा कांहीं चांगला शेवट जमेल, असं मला वाटत नाहीं. इथेच सोडून देतों झालं !

# ९

# किंचाळणाऱ्या आणि कुजबुजणाऱ्या !

बायकांच्या मुख्य जाती दोनच आहेत. किंचाळणाऱ्या आणि कुजबुजणाऱ्या. विवाहिता-अविवाहिता, मुलं असलेल्या-मुलं नसलेल्या, गोऱ्या–काळ्या, उंच-ठेंगू, कृशोदरी–लठ्ठ, नोकरी करणाऱ्या–नोकरी न करणाऱ्या, कुलीन–वेश्या, असे बायकांचे कितीतरी वर्ग पाडणें शक्य असलं तरी माझ्या मतें बायकांच्या खऱ्या जाती दोनच आहेत. आणि त्या म्हणजे किंचाळणाऱ्या आणि कुजबुजणाऱ्या. बायकांच्या अशा दोन जाती करणं मला स्वतःला फारच आवडतं. कोणत्याही अपरिचित स्त्रीशीं ओळख झाली कीं मी प्रथम ती किंचाळणारी आहे कीं कुजबुजणारी आहे, हें एकदां निश्चित ठरविण्याचा प्रयत्न करतों. आणि तिच्याबद्दल निश्चित मत बनेपर्यंत मला चैन पडत नाहीं.

पूर्वी मी जिथें रहात असे, तेथें मला मोठा तऱ्हेवाईक शेजार मिळाला होता. तीनच बिऱ्हाडें असलेली जागा होती ती. आमचं बिऱ्हाड मध्यें होतं आणि दोन बाजूंना दोन दुसरीं बिऱ्हाडें. पैकीं पश्चिमेच्या बाजूला कांहीं किंचाळणाऱ्या बायका रहात असत. आणि पूर्वेच्या बाजूला कुजबुजणाऱ्या बायका रहात असत. आज इतकीं वर्षं झाली असतील त्या गोष्टींना. पण आजही माझ्या कानांत किंचाळणाऱ्या बायकांचें ते कर्कश आवाज घुमताहेत आणि त्यामुळें माझं डोकं अगदीं सुन्न होऊन जात आहे. पण तेवढ्यांतच कुजबुजणाऱ्या शेजारणींची गोड कुजबुज माझ्या कानांना कसलं तरी अवीट सुख देत आहे.

काय गंमत असते पाहा! परीक्षा आतां अगदीं जवळ आली, आतां अभ्यासाला धूमधडाक्यानें सुरुवात केलीच पाहिजे, असं मी ठरवीत असे. सकाळीं चहा वगैरे झाल्यानंतर एकदां मांडी ठोकून बसायचं तो बारा वाजेपर्यंत उठायचं नाहीं, असं मी अगदीं नक्की ठरविलेलं असायचं. कांहींही झालं तरी अभ्यासाचा हा व्रत बदलायला मी तयार नसायचा. मी पुस्तक काढायचा आणि वाचायला लागायचा. पुस्तकांतला पुष्कळसा मजकूर आज आपल्याला कळताय, असं वाटूं लागायचं. पण एवढ्यांत शेजारच्या किंचाळणाऱ्या बायका आपल्या अस्तित्वाची जाणीव द्यायच्या. आणि त्यांची बडबड सुरू झाली कीं मग मला कांहींच सुचेनासं व्हायचं. कानांवर हात ठेवून मी वाचण्याचा प्रयत्न करायचा. एकदां कानांत घातलेला कापूस आंत अडकून पडला आणि तो बाहेर येईना, हा प्रसंगही मला चांगला आठवतो. किंचाळणाऱ्या बायकांचा त्रास होऊं नये म्हणून मला तेव्हां शक्य

१३८०३८ १०।१।५२



होते तितके सर्व उपाय मी करून पाहिले होते. तरीही त्याचा कांहीं उपयोग होत नव्हता. किंचाळणाऱ्या त्या बायकांची बडबड एकदां सुरू झाली कीं हातांतील पुस्तक भिरकावून देऊन कुठंतरी बाहेर पडल्याशिवाय मला गत्यंतरच नव्हतं.

वरं, हें किंचाळणं तरी काय होतं ठाऊक आहे का ? त्यांत विशेष असं कांहीं होतं, असं मुळींच नाहीं. त्यांत तसं कांहीं असतं तर तें ऐकण्याचं माझं औत्सुक्य वाढलं असतं आणि मग मला त्याचा त्रास झाला नसता. पण यांचे किंचाळण्याचे विषय अगदींच साधे. आपण सामान्य माणसें नेहमींच्या साध्या व्यवहारांत जें हळू बोलतों, तेंच त्या किंचाळणाऱ्या बायका अगदीं मोठ्यानें बोलत. चहा झाला आहे, भाजी किती महाग, कोण बाई ही गर्दी-पासून तो थेट आतां निजायला चला पाहूं पर्यंतच्या सर्व विषयांवरचे किंचाळवाणे शब्द आमच्या कानांवर येऊन आदळत.

किंचाळण्याचे त्यांचे विषय अगदींच सामान्य होते, हें मी म्हटलं खरं. पण त्यांत थोडी सुधारणा केली पाहिजे. त्या सामान्यांत असामान्यत्वही होतंच.

मुलांची समजूत कशी घालायची, हें तुम्हांला माहित आहे का ? थांबा, सांगतोंच. मूल कांहीं हट्ट धरून बसलं कीं त्याच्या अंगावर जोरानें खेकसायचं. याची प्रतिक्रिया म्हणून मूल रडायला लागतं. अशा तऱ्हेनें मूल रडूं लागलं कीं तुम्हीं त्याला कांहींतरी खाऊ देत असाल किंवा त्याला घेऊन बाहेरची " जम्मत " दाखवीत असाल. पण आमच्या या किंचाळणाऱ्या बायका काय करीत असत-माहित आहे ? मूल रडायला लागलं कीं त्याच्या पाठीवर एक

धपका बसायचा आणि किंचाळायचं "बोल, आतां रडशील?...आतां रडशील?" मग तें जास्तच रडूं लागलं की तितके आणखी धपके– आणि मग त्यामानानें मुलाचं रडणं. हे धपके आधीं संपत कीं रडणं आधीं संपे, हें पाहाण्याचा मी कितीदांतरी प्रयत्न करीत असे पण तें पाहाण्याचा मला कधींच योग आला नाहीं. कारण पांच सात मिनिटें धपके, किंचाळणें आणि रडणें ऐकल्यानंतर आणखी जास्त थांबणें मला कधींच शक्य होत नसे.

आणखी एक गंमत. नवरा–बायकोंचें एकांतांतील बोलणें ऐकण्याची तुम्हांला कधीं संधि मिळाली आहे का? बहुधा नसावी. पण मला अशी संधि पुष्कळदां मिळाली आहे. पण ती संधि मिळाली नसती तर किती बरं झालं असतं! नवरा–बायकोनीं एकांतांत कांहींतरी निराळं बोलायचं असतं, अशी माझी कल्पना होती. पण आमच्या शेजारच्या किंचाळणाऱ्या बायकांचं आपल्या प्रियकराशीं चाललेलं हितगुज ऐकून मी सर्दच पडलों. या हितगुजांतील शद्बन्‌शद्ब आमच्या कानावर पडायचा. कसलं गुपित नी कसलं काय?

"किंचाळणाऱ्या आणि कुजबुजणाऱ्या" हा लघुनिबंध लिहायचं कितीतरी दिवस माझ्या मनांत होतं. त्यापैकीं पहिली ओळ "बायकांच्या मुख्य जाती दोनच आहेत" हें मी आजपर्यंत कितीदांतरी लिहून खोडून टाकलं होतं. दुसरी ओळ लिहिण्याचा मी कितीदांतरी प्रयत्न केला असेल. पण प्रत्येक वेळेला त्या

किंचाळणाऱ्या बायकांनीं मला पुढचा मजकूर लिहूं दिलेला नव्हता !

किंचाळणाऱ्या बायकांचा मला त्रास होत होता आणि कुजबुजणाऱ्या बायका माझं मनोरंजन करीत होत्या. पश्चिमेकडे तोफांचा गडगडाट सुरू झाला कीं मी अगदीं अस्वस्थ होत असे पण तेव्हां पूर्वेकडून थोडीशी कुजबुजाट ऐकूं आली कीं मला जरा बरं वाटत असे. प्रखर उन्हाचा त्रास होत असतांना मध्येंच एखादी गार वाऱ्याची झुळूक यावी, तसं मला वाटायचं आणि याच कारणामुळें मी बिऱ्हाडाची जागा बदलायला तयार नव्हतों.

दुसऱ्याचं पत्र चोरून वाचूं नये किंवा कुजबुज चोरून ऐकूं नये, हें मला पटतं पण मला तें जमत नाहीं. अशा पुष्कळशा गोष्टी आहेत कीं ज्या करूं नयेत हें मला पटतं. पण त्या केल्याशिवाय मात्र रहावत नाहीं. शेजारीं चाललेली कुजबुज आपण कान लावून ऐकणं हें कांहीं सभ्यपणाचं नव्हे, याची मला पूर्ण जाणीव आहे आणि तेव्हांही होती. मी पुष्कळदां निश्चय करीत असे कीं उद्यांपासून आपण दुसऱ्यांची कुजबुज ऐकायची नाहीं. किंचाळणें सुरू झालं कीं जशीं आपण कानांवर बोटं ठेवतों, तसं कुजबुजणं सुरू झालं कीं आपण तिकडे लक्ष द्यायचं नाहीं. पण मला तें कधींच जमलं नाहीं.

वास्तविक त्या कुजबुजण्यांत विशेष असं कांहींच नव्हतं. पश्चिमेकडच्या बायका जें किंचाळून बोलत असत, तेंच पूर्वेकडच्या बायका कुजबुजत असत. मी कित्येक महिने हें कुजबुजणं ऐकत

होतों. तरीही मला वाटायचं कीं आपण चोरून यांचा कुजबुजाट ऐकलाच पाहिजे. त्यांचा कुजबुजाट सुरू झाला कीं माझे कान आपोआप तिकडे वळत असत.

पण तरीही मला कबूल केलंच पाहिजे कीं या कुजबुजाटांत कांहीं तरी काव्य होतं, निदान व्यवहाराचा रूक्षपणा तरी त्यांत खास नव्हता. चहा झाला आहे, असं सांगायचं झालं तर असं कुज-बुजायचं—"काय बाई तरी झोंप ही! उठा आतां. रात्रीं जाग्रण करायचं नी....कोण आलं तर काय म्हणेल बाई!" काय असेल तें असो, पण मला हा कुजबुजाट अतिशय प्रिय वाटायचा. मूल रडूं लागलं तर त्याला खाऊ द्यायचा आणि तो जास्तच हट्ट करूं लागला तर म्हणायचं—"अगदीं यांच्या वळणावर गेला आहेस!" आणि तें तरी किती हळू, मधुर, गोड! मग माझ्यासारखा चोरून कुजबुजाट ऐकूं लागला तर दोष कोणाचा?

मग शेवटीं मी विचार करूं लागतों कीं आपल्याला कोणत्या बायका आवडतात-किंचाळणाऱ्या कीं कुजबुजणाऱ्या?

विचार करून मी ह्या प्रश्नाचें उत्तर ठरवून टाकलं आहे-

—मला त्या बायका आवडतात-ज्या कधीं कधीं किंचाळतात पण नेहमीं कुजबुजतात!

# १०

# आकोरे

माझ्या खोलींत माझ्या बसण्याच्या जागेसमोर जें एक सुंदर चित्र आहे, तें मला अतिशय आवडतं. तीनचार वर्षांपूर्वी तें एकदां सहज दृष्टीस पडलं होतं. तें पाहातां क्षणींच मी त्याकडे एकदम आकृष्ट झालों होतों आणि कांहीं झालं तरी आपल्या खोलींत तें चित्र पाहिजेच, असं मी ठरवून टाकलं होतं. पुढं त्या चित्राकरितां कमालीची मोठी रक्कम देऊन मी तें खरेदी केलं होतं. त्यानंतर त्याला शिसवी लाकडाची तितकीच नाजुक फ्रेम करून घेतली होती. आणि तेव्हांपासून तें चित्र सतत माझ्या नजरेसमोर आहे. माझ्या खोलीचें तें एक वैभव आणि सौभाग्य आहे.

त्या चित्रांतील ती स्त्री एका सुंदर मंचकावर बसली आहे. ती पाठमोरी आहे. त्यामुळें साहाजिकच त्यांत तितकी नग्नता आलेली नाहीं. आणि तिच्या बसण्याच्या एकंदर पद्धतीमध्यें नग्नतेचा वासही नाहीं. अश्लीलता म्हणून जी कांहीं म्हणतात ती या चित्रांत मुळींच

नाहीं. मग ती कोणत्या पवित्र्यांत बसली आहे ? अशी कोणती सद्भिरुचीची चीज रंगाऱ्यानें रंगविली आहे ? होय, एकदम सांगून टाकलेलंच बरं. ती एक सुंदर आळोखा देत आहे.

सुंदर चित्रें पाहून मला नेहमींच आनंद होतो आणि अशा एखाद्या सुंदर कलाकृतिकडे कितीही वेळ पाहात बसलं तरी माझं समाधान होत नाहीं. मग त्या चित्राचा अर्थ लावण्याचा किंवा खालीं दिलेल्या कांहींतरी चमत्कारिक नांवाचा चित्राशीं संबंध जोडण्याचा प्रयत्न मी कधींच करीत बसत नाहीं. त्यामुळेंच चित्रांतील त्या सुंदरीच्या आळोख्याचा अर्थ काय आहे, याचा मी कधींच विचार केला नव्हता. आपल्याला यापासून आनंद होतोय ना, मग बस्स आहे, कशाला त्याच्या अर्थाबद्दल डोक्याला त्रास द्या, अशीच कांहींशी माझी वृत्ति त्या चित्राच्या बाबतींत होती.

पण कां कुणास ठाऊक, परवां सकाळीं तें चित्र दृष्टीस पडतांच मी कांहींसा अस्वस्थ झालों. सूर्याचे किंचित् गुलाबी वाटणारे किरण त्यावर पडले होते आणि त्यामुळें तें अधिकच खुलून दिसत होतें. पण माझ्याच्यानें तें आज पाहावेना. ही स्त्री अशी आळोखे देत कां बसली आहे आणि या आळोख्यांची पार्श्वभूमी कोणती असेल, हा प्रश्न चटकन् माझ्या डोक्यांत घुसला आणि तेंव्हांपासून मी अस्वस्थ झालोंय.

तो सबंध दिवस त्या आळोख्यांबद्दल विचार करण्यांत घालवला. पण मला कांहीं केल्या त्याचा अर्थ लागेना.

त्या दिवशीं संध्याकाळीं मी अंमळ उशीराच घरीं आलों. अगोदरच ठरल्याप्रमाणें सौभाग्यवती आपल्या मैत्रिणींबरोबर कुठच्या तरी मराठी बोलपटाला गेली होती. त्यामुळें दारांत उभं राहून मार्ग-प्रतीक्षा करणारी व नंतर लगेच स्टोव्हचा मधुर ध्वनि ऐकवणारी ती आज घरांत नव्हती. ताई कसलं तरी पुस्तक वाचीत बसली होती. वाचनांत ती इतकी गढून गेल्यासारखी दिसत होती कीं माझ्याकडे तिचं लक्षही नव्हतं. "अहो ताईसाहेब" अशी मोठ्यानें हांक मारल्यावर ती कुठें भानावर आली. "आम्हांला कांहीं चहाबिहा देणार का? आणि मग ताईनें असा कांहीं आळोखा दिला कीं मग मी एकदम बोलून गेलों, "बरं! बाहेरच कुठेतरी घेईन चहा झालं" आणि मी कोट तसाच खांद्यावर टाकून घरा-बाहेर पडलों.

त्या दिवशीं रात्रींही घरीं यायला मला थोडा उशीर झाला. कसेतरी चार घांस खाऊन घेतले आणि बिछाना गांठला. थोड्या वेळानें हीही आली. आणि माझी मनीषा ओळखतांच तिनें मुरका मारीत असा कांहीं आळोखा दिला कीं मी गारच झालों. तिचा हा नाजुक नखरा आणि हें गोड सौंदर्य मी आज प्रथमच पाहात होतों!

पहांटेस मला लवकर उठायचं होतं. दोनतीन अतिशय तांत-डीचीं कामें होतीं. पहांटेस लवकर उठायचं असलं कीं मला रात्रीं कधीं स्वस्थ झोंप येत नाहीं. मी पुन्हांपुन्हां जागा होतो आणि उजाडलं तर नाहीं ना अशा भीतीनें डोळे किलकिले करून घड्याळा-कडे पाहातों तों दोन, फार फार तर तीन वाजले असतात. चांगली

झोंप आली नाहीं कीं मोठीं चमत्कारिक स्वप्नें पडतात. पण त्या दिवशीं त्या स्वप्नांचा विषय एकच होता. भिंतीवरच्या त्या चित्रांतील सुंदर स्त्री नाना मनोहर रूपें घेऊन माझ्यापुढें येत होती आणि मी जास्त जास्त अस्वस्थ होत होतों.

तरीही ठरलेल्या वेळीं मी जागा झालों. खोलीचं दार हळूच उघडून बाहेर पडलों आणि आजींच्या चहाचं कुठपत आलं आहे,तें पाहूं लागलों. पण आजी अजून उठल्याही नव्हत्या. नेहमीं इतक्या लवकर उठणाऱ्या आमच्या आजी, पण कां कुणास ठाऊक, त्या हांका मारूनही जागा होईनात. शेवटीं एकदांच्या उठून बसल्या आणि आळोखा देत कांहीतरी म्हणाल्या, " इतक्या लवकर उठून कुठे रे बावा चाललास ? " पण माझं तिकडे लक्ष होतं कुठं ? आजीबाईनींही आळोखा द्यावा हं !

आणि नंतरच्या चहाच्या कपांत चित्रांतील स्त्री मला दिसत होती. घाईत चहांत साखर घालायला आजी विसरल्या होत्या, तेंही मला कळलं नाहीं. चहा करण्याचा आळस करणारी कालची ताई, लज्जेनें आरक्त होणारी पत्नी आणि दिवसभराच्या कामानें थकून भागून पहांटेस उठण्याचा आळस करणाऱ्या आजीबाई–तिन्हींजणी मला त्या चहाच्या कपांत दिसत होत्या आणि त्या तिघांना जोडणारा दुवा चित्रांतील ती सुंदर युवती होती !

मी ऑफिसांत गेलों. फायली काढून कामाला सुरुवात करणार इतक्यांत मला एकमोठी जांभई आली. साहेबांचं आपल्याकडे कितपत लक्ष आहे, हें पाहाण्याकरितां मी तिकडे पाहिलं तों ते

माझ्याकडेच पाहात होते. काय हो! रात्रीं जाग्रणबिग्रण झालेलं दिसतंय !" आणि माझे शेजारी खो खो करून हसूं लागले.

आणि त्या दिवशीं सारखं असं होत होतं. साहेब तर हात धुवून माझ्या पाठीला लागले होते. मला विचारतात कसे कीं काय हो, पेढ्यांची वगैरे कांहीं तयारी आहे कीं नाहीं? मी काय उत्तर देणार? एक आळोखा द्यावा असा विचार माझ्या मनांत आला. पण तसं करणं अगदींच बायकी आहे, असं वाटलं म्हणून एक अशी मोठी थोरली जांभई दिली कीं मग साहेबानें माझा नाद सोडून दिला!

घड्याळांत पांच ठोके पडले आणि मग आम्हीं घरीं जायची तयारी करूं लागलों. पण इतक्यांत कांहींतरी तांतडीचं काम आलं आणि तें आतांच्या आतां करून द्या, असा हुकूम सुटला. दोनचार शिव्या हांसडल्या, एक जांभई दिली आणि कामाला लागलों. सहज पाहिलं तों समोरच्या टाईपरायटरवर बसलेली मिस् मार्गारेट आळोखे अन् जांभया देत होती!

त्या दिवशीं रात्रीं मी जेव्हां घरीं आलों आणि भिंतीवर टांगलेलं तें चित्र माझ्या दृष्टिस पडलं, तेव्हां माझ्या मनाला पुष्कळसं समाधान वाटत होतं. कारण त्या आळोख्याचा पुष्कळसा अर्थ मला लागला होता!

# ११

# माझे मित्र

माझे सर्व मित्र "इतर जातीचे" आहेत, अशी विसुभाऊ माझी नेहमीं थट्टा करतात. शनिवार-रविवारीं किंवा इतर सुट्टीच्या दिवशीं मी ज्या मित्रांकडे जातों, किंवा जे मित्र माझ्याकडे येतात ते झाडून सारे इतर जातीचे आहेत, म्हणजे ते ब्राह्मण नाहींत. मला येणारीं पत्रें हीं मुख्यतः अशा इतर जातीच्या मित्रांचींच असतात. असं एखादं पत्र आलं कीं विसुभाऊ मला विचारतात— "कोणाचं आलं आहे पत्र?" मग मी त्या पत्राचं विस्तृत विवेचन सुरू करतों. पण मला मध्येंच थांबवून ते विचारतात, "अरे, त्याचं नांव सांग नांव." आणि मग मी नांव सांगितलं कीं ते असं कांहीं नाक मुरडतात कीं.... "अरे, आपल्या जातीचा एकही मित्र नाहीं का तुझा?" असा कांहीं तरी प्रश्न ते मला विचारतात. आणि या प्रश्नाचं उत्तर देणें मला शक्य नसतं. आपला एखादा तरी मित्र आपल्याच जातीचा आहे, असं त्यांना दाखविण्याचा मी कित्येक दिवस प्रयत्न करतोय. पण आजपर्यंत तरी मला तें जमलेलं नाहीं.

विसुभाऊ म्हणतात, तें कांहीं खोटं नाहीं. अगदीं लहान होतों तेव्हांपासूनच ब्राह्मणेतर लोकांशींच माझा संबंध आला. मी भातुकलीचे खेळ खेळलों ते कुणब्यांच्या मुलांत. विटीदांडू खेळलों तो हरीजनांच्याबरोबर. शिवाजीच्या जीवनावर छोटीं छोटीं नाटकें लिहून त्याचे प्रयोग केले ते मराठ्यांच्या मुलांत. पोहायला शिकलों आणि पोहतांना चुकून खोल पाण्यांत शिरून गटांगळ्या खातांना हात दिला तो एका भंडारी लंगोटी मित्रानें. आणि पुढं मोठा झाल्या घर जीवनांत प्रवेश केला तो देखील सर्व "इतर जातींच्या" सहकाऱ्यांसमवेत !

माझे मित्र जसे इतर जातीचे आहेत, तसे ते इतर धर्मांचेही आहेत. त्यांपैकीं एक ख्रिश्चन सहकारी तर माझा फार लाडका आहे. तो जरी आपल्या धर्माला चिकटून असला, आमच्या धर्मापासून कितीही दूर रहात असला आणि "मी देव मानीत नाहीं ! कसला आला आहे धर्म ! अफूची गोळी आहे ती-" अशी मी कितीही गर्जना केली आणि आम्हां दोघांचीं त्या विषयावर खूप भांडणें होत असलीं, तरी आम्हां दोघांच्या गोड संबंधांत त्यामुळें यत्किंचितही फरक पडत नाहीं. माझा दुसरा एक मुस्लिम सहकारी पार्शियन थाटाच्या मधुर लघुकथा लिहीतो. मराठी साहित्याला आपण अगदीं नवीन वळण देणार, असा त्याचा दावा आहे. त्याच्या लघुकथा मला फार फार आवडतात. आणि तो आमच्या मराठी साहित्याबद्दल कांहीं भलतं सलतं बोलूं लागला कीं माझ्यांतला महाराष्ट्रीयपणा जागृत होतो आणि आमचे खूप खटके उडतात. पण पुन्हां दुसऱ्या दिवशीं आम्हीं पूर्वीइतकेच एकत्र येतों !

माझे हे सहकारी अगदीं गोड स्वभावाचे असले आणि आमचं एकमेकांवर कितीही प्रेम असलं तरी एक प्रश्न मला सारखा त्रास देत असतो आणि तो हा कीं आपला एकही मित्र आपल्या जातीचा कसा नाहीं ? आणि असा जास्त जास्त विचार करूं लागलं कीं मला असं वाटूं लागतं कीं दोन भावंडांची जशी मैत्री होऊं शकत नाहीं, तसंच मित्रांचंही आहे. आमच्या शेजारचीच गोष्ट घ्या ना, हे दोघेही भाऊ जवळजवळ सारख्याच वयाचे आहेत. ते दररोज संध्याकाळीं नियमितपणें समुद्रावर फिरायला जातात. पण ते दोघे एकदम गेल्याचं निदान मला तरी आठवत नाहीं. त्या दोघांनाही आपल्याबरोबर कोणीतरी परकी यायला हवा असतो. ते आपापल्या मित्रांबरोबर बाहेर खूप गप्पा मारतील. पण घरीं आले कीं ते दोघे गप्प. हा त्याच्याबरोबर गप्पा मारायचा नाहीं कीं तो याला कांहीं विचारायचा नाहीं !

आणि म्हणूनच माझे सर्व मित्र, विसुभाऊ म्हणतात तसे इतर जातीचेच आहेत. दोन भावंडांची जशी मैत्री होऊं शकत नाहीं, तशीच एकाच जातीच्या दोघां जणांची मैत्री होऊं शकत नाहीं.

पूर्वीं वरवधूंचें गोत्र वगैरे पाहात आणि कांहीं प्रमाणांत आजही पाहातात. थोडंसं दूरचं नातें असलं, तर तें आजही खपत नाहीं. ह्याचं रहस्य काय ? वर आणि वधू शक्य तितक्या भिन्न कुळांतील असावेत, म्हणजेच त्यांची जोडी चांगली जमते, नाहीं तर नाहीं. आमच्या हिंदू-धर्मांत वर्णव्यवस्थेचें इतकं स्तोम माजलेलं आहे म्हणून, नाहींतर विवाह भिन्न जातींतच

झाले पाहिजेत, असं म्हणणारा कोणी महापुरुष निघाला असता आणि मग तीच पद्धत रूढ झाली असती. असं झालं असतं तर विवाहांतील गोडी नक्कीच कितीतरी पटींनी वाढली असती !

बस्स ! आजपासून मी ठरवलंय कीं विसुभाऊंची टीका एका कानानें ऐकायची आणि दुसऱ्या कानानें सोडून द्यायची !

संग्रहालय ठाणे
संदर्भ शाखा

# १२

# सही

वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या मुलाखती मी नेहमींच मोठ्या कुतुहलानें वाचतों. एखादं वर्तमानपत्र हातीं पडलं कीं माझं लक्ष प्रथम त्यांत प्रसिद्ध झालेल्या एखाद्या मुलाखतीकडे जातं. आणि एखाद्या आधाश्याप्रमाणें मी ती वाचून काढतों. मुलाखत वाचून झाली कीं मग मी स्वतःशींच थोडा हंसतो आणि मिळण्यासारखा असल्यास थोडा चहा नाहींतर नुसती सिगारेट शिलगावून मी स्वतःशींच विचार करूं लागतों कीं आपली मुलाखत घ्यायला कोणी आला तर आपण त्यांत काय काय सांगायचं? निरनिराळीं शब्द-कोडीं मीं सोडवतों तीं केवळ पैशांच्या आशेनें नव्हे. त्यांत यशस्वी झालों तर कोणीतरी आपली मुलाखत घ्यायला येईल या आशेवर. आणि त्या वेळीं आपण अशीं कांहीं उत्तरें देऊं कीं......

तुम्हाला कोणत्या गोष्टीचा विशेष नाद आहे असं मला कोणीं विचारलं तर माझं उत्तर तयार आहे. मला लोकांच्या सुंदर

सुंदर सह्या जमविण्याचा व स्वतः निरनिराळ्या सह्या करण्याचा नाद आहे. आजपावेतों विविध व्यवसायांतील विविध लोकांच्या सह्या मी जमवून ठेवल्या आहेत.

मला स्वतःला सह्या करण्याची भारी हौस आहे आणि मला जेव्हां जेव्हां संधी येते तेव्हां तेव्हां तिचा मी पुरेपूर फायदा घेतों. ऑफिसमध्यें मी नोकरीला होतों, तेव्हां लखोटे करण्याचं काम मी माझ्याकडे मुद्दाम मागून घेत असे. लखोट्यावर पत्ता लिहून झाला कीं अगदीं "कारकून अमुक अमुक ऑफिस" म्हणून कां होईना, पण सही करण्यांत मला कोण आनंद वाटायचा! आणि आपली ही सही आंतील साहेबाच्या सहीपेक्षां किती तरी पटींनीं सुंदर असल्याबद्दल किती अभिमान वाटायचा! साहेब होण्याला लागणारे इतर गुण माझ्याजवळ नसले तरी अगदीं सुंदर सही करतां येते, एवढयावरच पुढें केव्हांतरीं मी साहेब होईन, असा मला आत्मविश्वास वाटत होता!

मनुष्याच्या ठिकाणीं सही करण्याची जी अनिवार इच्छा असते, तिचा जन्म कुठं झाला आहे हें नक्की सांगतां येणं कठिण आहे. कदाचित् आपलें वर्चस्व गाजविण्याचें तें एक साधन असेल. माझे एक स्नेही आहेत. चांगल्या लठ्ठ पगारावर आहेत ते. त्याप्रमाणें खर्चही जास्त होतोच. एक तारखेला पगार झाला कीं घरभाडें, दूध, परमिट, नोकरांचे पगार असे ठळक ठळक खर्च केल्यानंतर उरलेले सारे पैसे ते बँकेंत टाकतात. आणि ते देखील एकाच बँकेंत नव्हे, तर निरनिराळ्या चार बँकांत.पुष्कळ दिवसांपासून मला हें कोडं पडलं होतं. कदाचित् एखाद्या बँकेचें दिवाळं निघाल्यास आपले पैसे

बुडूं नयेत म्हणून हे असं करीत असावेत, असा माझा तर्क होता. पण परवां माझ्या पत्नीनें मला तें रहस्य सांगितलं. "अहो दोन तारखेला पैसे बँकेंत गेले, म्हणजे तीन तारखेपासूनचे होणारे सारे खर्च ते चेकनें भागवतात. गेले एखाद्या दुकानांत, घेतलं चेकबुक आणि दिला चेक सही करून. दुसरीकडे कुठं गेलं, तिथें दुसरा चेक. स्वारीचा सबंध महिना अशा प्रकारें चेकवर गुजरतो आणि एकाच बँकेनें कटकट करूं नये म्हणून त्यांनीं चार बँकांत आपला हिशोब ठेवला आहे!" या गृहस्थानें परवां एका भिकाऱ्याला एक आण्याचा चेक दिल्याचं जेव्हां तिनें सांगितलं, तेव्हां आमची हंसतां हंसतां अगदीं पुरेवाट झाली.

पण ते आपला सारा व्यवहार चेकनें करतात, प्रत्यक्ष रोकड ठेवत नाहींत, घेतला चेक त्यावर ठोकली सही कीं दिला, अशा बादशाही रूबाबांत वागतात, याबद्दल मला अतिशय हेवा वाटतो. आपणही तीच पद्धत सुरू करावी, असं मी म्हणतों. पण सर्व रोकड स्वतःजवळ ठेवणारी आणि मन मानेल तसा खर्च करणारी माझी पत्नी कांहीं ऐकत नाहीं! शिवाय दररोज चेक काढण्याची संधी आल्यास त्यावर सही कोणी करायची, याबद्दल उगाच आणखी भांडत बसायचं आणि मग ते रुसवे आणि फुगवे!

माझ्याकडे शिकायला येणाऱ्या एका हुषार आणि तरतरीत विद्यार्थ्याला परवां मी एक चवरखा दिला आणि त्यावर सही कर म्हणून सांगितलं. "कसली करूं" म्हणून त्यानें प्रश्न विचारतांच मी गार पडलों. "अहो! कसली म्हणजे बाळबोध, मोडी, उर्दू कीं इंग्रजी?" चारीही प्रकारच्या सह्या करण्यास सांगितल्यावर स्वारीनें

अशा कांहीं चार रुबाबशीर सह्या पुढें केल्या कीं मी थक्कच पडलों. हा पुढें नक्कीच कोणीतरी मोठा होणार, अशी माझी खात्री पटली. " सर ! ज्यांना सही करण्याचे प्रसंग वारंवार येतात, पण ज्यांना बऱ्यापैकीं सही करतां येत नाहीं अशांकरितां आपण उत्कृष्ट सही करून देण्याचा बिझिनेस सुरू केला तर हो ? अगदीं स्वस्त म्हणजे रुपयानें एक सही लावायची ! आपला घरबसल्या धंदा ! तुम्हाला काय वाटतं ? " त्याच्या योजनेबद्दल मला अद्यापपर्यंत मत देतां आलेलं नाहीं—

एखाद्याच्या सहीवरून त्याच्या अंतरंगाची परीक्षा करणं फारसं चुकीचं होईल, असं मला वाटत नाहीं. मोठ्या लोकांकडे भेटायला जातांना अगोदर आपलं नांव लिहून पाठवावं लागतं, याचा अर्थ तरी काय आहे ? आपणाला भेटायला आलेली व्यक्ती पुढें नसते, पण त्याचं हस्ताक्षर पुढं असतं. त्या सहीवरून आपणाला भेटायला येणारा माणूस कसा असला पाहिजे, याबद्दल सहज तर्क करतां येतो. ऑफिसमध्यें मी असतांना माझ्या टेबलावर कितीतरी काम सांचून रहायचं आणि मग रिमाइंडर्स (Reminders) यायचे त्यापैकीं कुठचं प्रकरण अगोदर हातीं घ्यायचं, हें ठरविण्याकरितां मी त्या रिमाइंडरखालची सही पाहात असे आणि ती सही करणारा माणूस कसा असला पाहिजे, या विषयीं कयास बांधीत असे. सही करणारा अतिशयच तापट असल्यास त्याचें उत्तर लगेच पाठवायचं आणि स्वभावानें अगदीं साधा असल्यास तें प्रकरण पुन्हां रिमाइंडर येईपर्यंत तसंच दाबून ठेवायचं. कारण तो साहेब करून करणार तरी काय, हें मला पूर्ण माहित असतं.

आणि हे सारे कयास मी त्यांच्या सह्या पाहून करीत असे. सह्यांचे निश्चित ठोकताळे मीं माझ्या मनाशीं करून ठेवले आहेत. उंच उभी सही करणारा उंच आणि शरीरानें अशक्तच असला पाहिजे, आणि ज्याच्या सहीला जवळजवळ उंची नाहींच, तो तितकाच ठेंगणा असला पाहिजे. अगदीं किचकट सही करणारा स्वभावानें चिरचिरा असला पाहिजे. अगदीं साधी, सरळ आणि बालबोध वळणाची सही करणारा माणूस तितकाच भाबडा आणि सरळ मनाचा असला पाहिजे. सुंदर घोंटीव अन् कलात्मक सही करणारा तितकाच रसिक आणि कलात्मक असला पाहिजे. माझे हे ठोकताळे सहसा चुकत नाहींत.

माझी सही पाहून लोक माझ्याबद्दल काय कल्पना करीत असतील, कुणास ठाऊक !

# १३

# कल्पना

कालच मी एक हिंदी कादंबरी वाचून संपविली. कादंबरी मला अतिशय आवडली. एका क्रान्तिकारकाचें जीवन त्यांत रेखाटण्यांत आलं आहे. नायकाच्या मागें पोलीस लागलेले असतात व कसेतरी लपूनछपून तो दिवस काढीत असतो. त्याच्या पार्टीतील त्याच्या इतर मित्रांबरोबर त्याचे मतभेद होतात आणि या गोष्टी इतक्या थराला पोंचतात कीं ते त्याचा काटा काढण्याचा विचार करूं लागतात.

अशा वातावरणांत तो नायक आणि जिच्यावर त्याचं प्रेम होतं, ती शैलबाला मसुरीच्या थंड हवेंत जातात. येथें एक चमत्कारिक प्रसंग आहे.

नायकाचें नैसर्गिक कुतूहल पराकोटीला पोंचतं. स्त्री खरोखरच किती सुंदर असते, हें पाहाण्याची त्याला अनावर इच्छा होते

आणि थोडे आढेवेढे घेऊन कां होईना, पण शैलबाला नग्न होऊन त्याला तें सौंदर्य दाखविते—

तें स्त्रीसौंदर्य पाहिल्यानंतर नायकाच्या मनांत काय विचार आले, ते कादंबरीकारानें दिलेले नाहींत. पण मला वाटतं, तें स्त्रीसौंदर्य आपण उगाच पाहिलं, असं त्याला वाटलं असेल. स्त्रीच्या ज्या सौंदर्याकरितां सारी पुरुषजात अधीर झालेली असते, त्या सौंदर्याची आपण जोंपर्यंत कल्पनाच करीत होतों तोंपर्यंतच बरं होतं, असं त्याला वाटलं असेल. शैलाच्या झिरमिरित वस्त्राआडच्या सौंदर्याची आपण जोंपर्यंत नुसती कल्पनाच करीत होतों, तोंपर्यंतच त्यांत गोडी होती आणि तें सौंदर्य एकदां पाहिल्यानंतर आतां त्यांत विशेष गोडी राहिलेली नाहीं, असंच त्या नायकाला वाटलं असलं पाहिजे.

निदान मला तरी असं वाटतं. आणि त्या नायकासारखी मला कधीं संधी मिळाली तर मी तसा मूर्खपणा कधींच करणार नाहीं. "हे सुंदरी! तूं फारच सुंदर आहेस." असं मी म्हणेन आणि तिच्या "त्या" सौंदर्याबद्दल मी नुसती कल्पनाच करीन. "त्या" सौंदर्याच्या दर्शनाची इच्छा मी मुळींच प्रदर्शित करणार नाहीं, कारण जोपर्यंत मी तें पाहिलें नाहीं, तोंपर्यंतच त्यांत गोडी आणि काव्य आहे.

कादंबरींतील त्या शैलबालाला नायकाबद्दल अतिशय सहानुभूति वाटूत तिनें तें सौंदर्य दाखविलं, तरी मला त्या नायकाबद्दल

मुळींच सहानुभूति वाटत नाहीं. उलट त्याच्या शहाणपणाची मला कींव करावीशी वाटते !

आणि याच कारणामुळें मोठमोठे लोक मी अद्याप पाहिलेले नाहींत. मोठमोठे मुत्सद्दी, लोकप्रियतेच्या शिखरावर चढलेले पुढारी आणि गाजलेले लेखक व कवि मी अद्याप पाहिलेले नाहींत. त्यांना पाहाण्याची कधीं संधी आलीच, तर मी ती मुद्दाम टाळतों. ते कसे असतील, ह्याची कल्पना मला आहे. ते दिसायला असे असतील, असे चालतील, असे बसतील, असे हंसतील-''वगैरे कल्पना मी माझ्या मनाशीं निश्चित करून टाकल्या आहेत. पण त्यांना प्रत्यक्ष पाहिलं तर माझ्या या सुंदर कल्पना धुळीस मिळतील, अशी मला भीति वाटते. आणि म्हणूनच जोपर्यंत मी त्यांना प्रत्यक्ष पाहिलं नाहीं, तोपर्यंत ठीक आहे, असं मला वाटतं.

नुकताच मी दिल्लीपर्यंत फिरून आलों आणि दिल्लीला गेला तरी ताजमहाल पाहून आला नाहीं, म्हणून माझ्या मित्रांनीं माझ्या अरसिकतेची कींव केली ! पण या अरसिकतेंतील रसिकता त्यांना काय माहीत? ताजमहालबद्दल मी मनाशीं कल्पना करून ठेवल्या आहेत आणि पुष्कळदां स्वप्नांत मी ताजमहालचें दर्शन घेतों. शेजारून खळखळत जाणाऱ्या यमुना नदीच्या किनाऱ्यावर ताजमहाल कसा बसला असेल याची मला पूर्ण कल्पना आहे, आणि म्हणूनच तो प्रत्यक्ष पहावा, असं मला वाटत नाहीं. प्रत्यक्ष पहावा असं वाटत नाहीं म्हणण्यापेक्षां तो पाहाण्याची अनिवार इच्छा मी आजपर्यंत दाबून ठेवली आहे. आणि जोंपर्यंत ती तशीच दाबून ठेवली आहे तोंपर्यंत

त्यांत खरं काव्य आहे, एवढं खास. न जाणों, उद्यां ताजमहाल पाहून माझ्या मनांतील सुंदर कल्पना उध्वस्त होऊन जायच्या !

आणि हीच गोष्ट पत्रांची. पोष्टकार्डापेक्षां बंद पाकीट मला इतरांप्रमाणेंच आवडतं. संध्याकाळीं घरीं आलों कीं मी माझ्या टेबलावर एखादं पत्र पडलं आहे का, हें पाहातों. एखादं कार्डच असलं तर तें पटकन पाहाण्याचा मोह मला अनिवार होतो. पण तें बंद पाकीट असलं कीं माझ्या या मोहाला मी थोडी मुरड घालतों. आणि त्या पत्रांत काय असेल, याचा मी मनाशीं उगाचच विचार करूं लागतों आणि असा विचार करतां करतां जितका वेळ घालविणं मला शक्य असतं, तेवढा मी घालवितों. आणि मग तो मोह अगदींच अनिवार झाला कीं तें पाकिट फोडून पत्र अधाशीपणानें वाचूं लागतों. पण एवढं खास कीं पत्राबद्दल कल्पना करीत बसण्यांत जेवढं काव्य असतं, तेवढं तें प्रत्यक्ष वाचण्यांत नसतं !

म्हणजे, प्रत्यक्षापेक्षां कल्पनाच बरी असते म्हणायची !

# १४

# पहिलं?....छे! शेवटचं!!

आमच्या कवीलोकांत कांहीं संकेत पडले आहेत. ठराविक गोष्टींचें वर्णन करतांना ठराविक रूपकेंच साधायचीं, विशिष्ट परिस्थिति दाखवितांना तें विशिष्ट वातावरण निर्माण करायचं. "पहिल्यांत जी मजा आहे, ती दुसऱ्या कशांतही येणार नाहीं," असं जेव्हां जेव्हां हे लोक म्हणतात, तेव्हांही त्यांची हीच वृत्ति असते. त्यांच्या मतें कोणतीही गोष्ट प्रथम करतांना त्यांत जी मौज असते, जें सौंदर्य असतं, जें काव्य असतं, तें दुसऱ्या कशांतही असणं शक्य नाहीं.

माझ्या मतें या कवींनीं आपली अगदीं गैरसमजूत करून घेतली आहे आणि दुसऱ्यांचीही करून दिली आहे. ज्यांना केवळ पहिल्यांतच गोडी वाटते, अशांनीं त्या पहिल्याच्या पुढच्या कशाचा विचारही केलेला नसावा. कोणतीही गोष्ट पहिल्यांदा करतांना त्यांत एवढं असतं तरी काय? दाढीचा पहिला केस! पहिलावहिला म्हणून

त्यांत एवढं कौतुक करण्यासारखं काय आहे ? आणि आपला "पहिला पांढरा केस" दिसत असतांही आपल्या तरुणपणाचं समर्थन करणारे म्हातारेही तितकेच हास्यास्पद नाहींत काय ? दाढीचा पहिला केस काय, किंवा "आतां म्हातारा झालासरे बाबा" सांगणारा पहिला पांढरा केस काय, त्याला डोक्यावर घेऊन नाचण्यासारखं त्यांत काय आहे ? दाढीच्या एका केसाला साथ द्यायला उद्यां दुसरे साथीदार येतील आणि एका पांढऱ्या केसाला मदत करायला त्याचे कितीतरी भाईबंद धांवून येतील—

आणि हीच गोष्ट पहिल्या चुंबनाची. आपल्या प्रियेचं पहिलं चुंबन घेणारा प्रियकर किंवा प्रियकराचं पहिलं चुंबन घेणारी प्रिया यांना काय वाटत असेल ? हें चुंबन कांहीं असं नव्हे कीं जें पुन्हां कधींही मिळणार नाहीं ! माझ्या मतें तर पहिल्या चुंबनांत कांहींच मजा नाहीं. चुंबनांची "संख्या" ज्या प्रमाणांत वाढत जाईल, त्या प्रमाणांत त्यांची गोडी वाढत जाईल आणि तेव्हां तें पहिलं चुंबन अगदींच फिकं वाटूं लागेल. कदाचित् शेवटीं अशी स्थिति येईल कीं तें चुंबन शेवटचं असेल. त्या शेवटच्या चुंबनांत जी गोडी आहे ती पहिल्यांत असेल, असं मला नाहीं वाटत—

एखाद्या विवाहितेला जेव्हां पहिला मुलगा होतो, तेव्हां तिला कितीही आनंद झाला असला तरी, त्यांत कांहीं विशेष आहे, असं नाहीं. उलट आपला पति आपल्याला सोडून गेल्याला दोन तीन महिने झाले आहेत आणि आपल्याला मुलगा झाला आहे. तो मुलगा आपल्या प्रियकराचं प्रतीक आहे. यापुढं आपल्याला मूल होणार नाहीं, हा शेवटचाच मुलगा, याची तिला जाणीव आहे.

मग या शेवटच्यांत जें काव्य आहे, तें पहिल्यांत असणं शक्य आहे का ?

आपण ही शेवटची मॅच खेळून क्रिकेटच्या क्षेत्रांतून निवृत्त होणार, असं म्हणणारा एखादा ब्रॅडमन, किंवा ही आपली शेवटची कविता किंवा हा आपला शेवटचा लेख म्हणून लेखणी कायमची खालीं ठेवणारा एखादा कवि किंवा लेखक यांना त्या शेवटच्या प्रसंगीं काय वाटत असेल ? ब्रॅडमन्च्या डोळ्यांपुढें आपल्या क्रिकेटच्या आयुष्यांतील अनेक प्रसंग उभे रहात असतील आणि त्या क्रिकेटला आपण मुकणार, म्हणून त्याची मनःस्थिति कशी झाली असेल ! आपल्या इतक्या कविता प्रसिद्ध झाल्या, आपण लोकप्रियतेच्या शिखरावर चढलों, आतां आपण लेखणी खालीं ठेवणार, असं म्हणणाऱ्या त्या लेखकालाही काय वाटत असेल —

लढाईवर जाणारा एखादा शूर वीर जेव्हां आपल्या प्रियेला शेवटचा येऊन भेटतो आणि तिचा निरोप घेतो, तेव्हां त्या दोघां-नाही काय वाटत असेल ? आपणांस रणांगणावर देह सोडावा लागणार, याची त्याला खात्री आहे. आपला लाडका आपणांला पुन्हां कधींही भेटणार नाहीं, अशी तिला भीति वाटत्येय. त्या वेळीं त्यांची शेवटची भेट कशी होत असेल ? त्यावेळीं तो काय बोलत असेल ? ती काय उत्तर देत असेल ? दोघांचें हुंदके एकमेकांत मिसळून जात असतील, दोघांच्या डोळ्यांतील गंगायमुनांचा संगम होत असेल आणि दोघांचे अधर एकमेकांना शेवटचे भिडले असतील. या चुंबनांत जें काव्य आहे, तें पहिल्या पहिल्या चोरून, घाईनें आणि लज्जेनें घेतलेल्या चुंबनांत आहे काय ?

शाळा कॉलेजांत शिकलेल्यांना या शेवटच्या दिवसाचें महत्त्व सहज समजूं शकेल. मॅट्रिकच्या वर्षीं शाळेंतून निरोप देण्याचा समारंभ होतो शाळेला कांहीं तरी वस्तु आपली स्मृति म्हणून देण्यांत येते. आपले इतके दिवसांचे प्रिय शिक्षक रूमालानें डोळे पुशीत आपल्याला निरोप देतात. आपले इतर सहकारीही आपल्यापासून दूर जायचे असतात. अशा प्रसंगांत जें काव्य आहे, तें शाळेच्या पहिल्या दिवसांत आहे काय ? मी शाळेंत ज्या दिवशीं प्रथम गेलों, तो दिवस माझ्या ध्यानांतही नाहीं. पण तो शेवटचा दिवस माझ्या स्मृतिपटलावरून पुसला जाणं कधींही शक्य नाहीं.

कोणत्याही शेवटच्या गोष्टींत जें काव्य असतं, तें कशांतही असणं शक्य नाहीं. विशिष्ट गोष्टींत तन्मय होऊन जाण्याची वृत्ति, वाटेल तें करण्याची शक्ति कांहींसं समाधान, कांहींशी अतृप्ति, थोडा आनंद, थोडं दुःख, थोडा उन्माद, थोडी विरक्ति या सर्वांचं चमत्कारिक मिश्रण कोणत्याही शेवटच्या गोष्टींत झालेलं असतं. शेवटच्यांत जी मौज असते, ती पहिल्यांतच नव्हे तर दुसऱ्या कशांतही असणं शक्य नाहीं—

सृष्टीला करपून टाकणाऱ्या शिशिराचा जेव्हां शेवट होतो, तेव्हांच कोकिळेच्या मधुर गीताच्या तालावर पदक्षेप करीत वसंत अवतरतो.......

# १५

# दोन स्वप्नें

नेरळ ते माथेरान हें सात मैलांचें अंतर पायीं तोडून माथेरानच्या गर्द झाडींत आम्हीं चहाचा पहिला कप घेतला, तेव्हां अंगांत अगदीं नवीन चैतन्य आल्यासारखं वाटत होतं. सात मैल चढ चढून आल्यामुळें आलेला थकवा आम्हीं केव्हांच विसरून गेलों. अंगाला गुदगुल्या करणारी चावट थंडी, भगवान सूर्य-नारायणाचं दर्शन न करूं देणारे वृक्ष, आमच्याकडे पाहून आम्हांला वेडावणारीं माकडें आणि या साऱ्या जोडीला चहाचा एक कप आणि अगदीं खास विकत घेतलेली उंची सिग्रेट....मुंबईचं बकाल जीवन विसरून नंदनवनांत आल्यासारखं वाटलं आम्हांला...

पहिली सिग्रेट संपवून तिच्यावरच मी दुसरी सिग्रेट पेटवीत होतों. इतक्यांत माझं लक्ष सहज समोर गेलं आणि मग मी एका-एकीं अस्वस्थ झालों. ज्या जीवनापासून मी दूर पळून आलों होतों आणि चार आठ दिवस अगदीं आनंदांत घालविणार होतों, तें

जीवन अक्राळविक्राळ तोंड करून माझ्याकडे पाहून हंसतंय् असं मला वाटलं. मुंबईच्या हवेला मी कंटाळलों होतों. मुंबईच्या बकाल-पणाचा मला वैताग आला होता. भांडणाऱ्या आणि उगाच ओरड-णाऱ्या चाळींतील बायकांनीं माझं जीवन असह्य करून टाकलं होतं. मुंग्यांसारख्या वळवळणाऱ्या गर्दीनें जीव नकोसा केला होता दारिद्र्य आणि दैन्यावस्था माझ्याकडे पाहून हंसत होतीं. आणि या साऱ्या समाजरचनेचा मला अगदीं संताप आला होता.

पण मी दुबळा होतों. समाजांत राहून मी कांहीं उलथापालथ करूं शकत नव्हतों. नुसती सहानुभूति व्यक्त करूं शकत होतों. यापेक्षां कांहीं करणं माझ्या हातांत नव्हतं. पण या समाजापासून कांहीं दिवस दूर पळून जाणें मला खास शक्य होतं आणि म्हणून मी तोच मार्ग पत्करला होता. मुंबईहून पळून माथेरानला गेलों. तें जीवन विसरून चारआठ दिवस कां होईना, पण आम्हीं अगदीं सुखांत घालविणार होतों. त्या जीवनांतील आठवणीही आम्हीं आमच्या मनांत आणूं देणार नव्हतों.

म्हणूनच नेरळ स्टेशनवर वर्तमानपत्र विकत घेणाऱ्या माझ्या मित्राला मी बजावलं कीं वर्तमानपत्र विकत घेतां कामा नये. या जगांतील सारीं दुःखं विसरून आपण माथेरानला रहायचं. या जगाची दुर्गंधी तेथें येतां कामा नये....

यामुळेंच माथेरानला चहाचा पहिला कप घेतांना माझं हृदय आनंदानं उचंबळून आलं होतं. सिग्रेटचा धूर सोडतांना मला कमालीचं सुख वाटत होतं. भावी सुखाच्या कल्पनेनें आलेल्या

कांहींशा उन्मादावस्थेंत मी होतों. इतक्यांत माझं लक्ष सहज समोर गेलं आणि मग मी एकाएकीं अस्वस्थ झालों. लाल कपडे घातलेलीं तीन माणसें चढणीवर रिक्षा ओढीत होतीं. एकजण पुढें राहून रिक्षा ओढीत होता आणि दोघेजण मागून ढकलीत होते. रस्ता अतिशय चढणीचा होता. त्या तिन्हीं माणसांचा जीव घामाघूम झाला होता आणि त्यांच्या हृदयाची धडधड स्पष्ट ऐकूं येत होती. उंची रेशमी कपडे घातलेला एक गलेलठ्ठ माणूस रिक्षामध्यें बसला होता. आणि "जरा जोरसे" नेण्याचा त्यांना हुकूम सोडीत होता.... आणि हेंच दृश्य पाहून मी अस्वस्थ झालों. माथेरानच्या साऱ्या आनंदावर विरजण पडल्यासारखं वाटलं.

मग मी थोडा शहाणपणाचा विचार केला कीं साऱ्या समाजांतच हें चाललंय. त्याकडे पाहून वाईट वाटलं तर मनुष्याच्या नशीबांत सुख कधींच येणार नाहीं. म्हणून मी तें दृश्य विसरण्याचा प्रयत्न केला आणि माथेरानचं सुख कमी होणार नाहीं, याची खबरदारी घेऊं लागलों.

पण तें माझ्या नशीबीं नव्हतं. चारपांच दिवस आम्हीं माथेरानला खूप हिंडलों. चारलोटी लेक पाहिलं, हनीमून आणि एको हे पॉईंट पाहिले. ल्युसा पॉईंट पाहिला, गारबट पाहिला, पॅनोरमा पाहिला. सिंपूसनच्या धबधब्याखालीं मनसोक्त स्नान केलं आणि मॅलेट झऱ्याचं अमृततुल्य पाणी प्यालों. पण हें सारं करतांना माझ्या मनाला कांहींतरी बोचतंय् असं वाटत होतं. रिक्षा ओढणाऱ्यांचें तें दृश्य मी विसरण्याचा प्रयत्न करीत होतों पण तें विसरणं तितकं सोपं नव्हतं. आणि थोडा काळ विसरलोंच, तर तेवढ्यांतच दुसरी

एखादी रिक्षा दृष्टीस पडे आणि धापा टाकीत रिक्षा ओढणाऱ्या त्या माणसांकडे पाहिलं कीं अंगावर शहारे येत. एखादा सुंदर पॉईंट पाहून परत येत असतांना आमची समाधी लागलेली असायची आणि तेवढ्यांतच हे धापा टाकीत रिक्षा ओढणारे लाल डगलेवाले आम्हांला चिमटा काढायला यायचे.......

त्या दिवशीं रात्रीं कितीतरी वेळ मला झोंप येईना. थोडासा डोळा लागे इतक्यांत ते लाल डगलेवाले डोळ्यापुढं येऊन आपलीं तोंडं केविलवाणीं करून उभे रहात. मग मी पूर्वीसारखाच विचार करूं लागलों कीं यांत विशेष असं कांहींच नाहीं. साऱ्या समाजांत जें चाललंय, तेंच इथें आहे. समाजाचं नग्न स्वरूप आपल्याला पाहायला मिळालं, म्हणूनच आपल्याला चमत्कारिक वाटतंय. आपल्या तुकतुकीत गोऱ्या मांड्या अगदीं ढुंगणापर्यंत उघड्या टाकणाऱ्या तरुण स्त्रिया आपण येथें कितीतरी पाहिल्या, तें पाहून चमत्कारिक वाटलंच. दुसरींही चावट उघडीं नागडीं दृश्यें येथें आपल्याला खूप पाहायला मिळालीं, तींही चमत्कारिक वाटलीं. पण खरोखरीं पाहातां त्यांत चमत्कारिक असं कांहींच नाहीं. आपण राहातों त्या जगांत हें सारं कांहीं चाललंय. पण त्याचं अगदीं नग्न स्वरूप आपल्याला पाहायला मिळालं, म्हणूनच आपल्याला चमत्कारिक वाटलं....

लाल डगलीं घालून रिक्षा ओढणारीं माथेरानचीं तीं माणसं म्हणजे आपल्या समाजरचनेचं असंच नग्न दर्शन होतं आणि म्हणूनच आपल्याला इतकं चमत्कारिक वाटलं. समाजांत हें नेहमींच चाललंय. रिक्षा ओढण्याइतकं नग्न स्वरूप मात्र त्याला

नाहीं, म्हणून आपल्याला त्याचं विशेष कांहीं वाटत नाहीं. समाजांतले सारे व्यवहार चालले आहेत, ते वर आवरण घालून. तें आवरण दूर केलं कीं असंच किळसवाणं दृश्य नजरेस पडेल. आपण नेहमीं जो समाज पाहतों त्याच्यावर झिरझिरित आच्छादन घातलेलं असतं. त्यामुळें त्याचं पूर्ण दर्शन आपणांला होत नाहीं.

पण तरीही माझ्या मनाचं समाधान होईना. आपल्या समाज-व्यवस्थेच्या त्या नग्नपणाचं दर्शन झाल्यानंतर मी अधिकच अस्वस्थ झालों.

आजही माझ्या स्वप्नांत ते लाल डगलेवाले येतात आणि केविलवाणीं तोंडं करून माझ्याकडे पाहूं लागतात. रिक्षामध्यें बसणारीं गलेलठ्ठ माणसं माझ्याकडे पाहून उपहासानें हंसतात. माझा हात शिवशिवूं लागतो. पण तेवढ्यांत मी जागा होतों. नंतर कितीतरी वेळ मला झोंप लागत नाहीं.

आणि मग पहांटेस मला दुसरं स्वप्न पडतं. एका नवीन जगांत मी वावरत आहे, असं वाटूं लागतं. तेथें माणसं रिक्षा ओढीत नाहींत नी श्रीमंत-गरीब हा भेद नाहीं. तेथें सगळे सारखे आहेत. सर्वांना काम मिळतंय आणि सर्व एकोप्यानें, प्रेमानें आणि बंधुभावानें रहात आहेत. श्रमिक वर्गाचा लाल झेंडा मोठ्या डौलानें फडकत आहे !

# १६

# असं झोंपावं....

मराठी शाळेंत चौथ्या इयत्तेंत असतांना आरोग्यशास्त्रावरचं एक पुस्तक प्रथम माझ्या हातीं पडलं आणि तें मी मोठ्या कुतूहलानें एका दिवसांत वाचून टाकलं. पडसं कां येतं, ताप कसा येतो, प्लेगचे उंदीर कसे ओळखावेत यापासून तों दररोजचा आहार कसा असावा, कपडे कसे असावे, व्यायाम किती आणि कसा करावा वगैरे सर्व भाग मी झराझर वाचून संपविला आणि पुस्तकांत केलेला उपदेश मी शक्यतर आचरणांतही आणण्याचा प्रयत्न करूं लागलों. "वेडा रे वेडा !" म्हणून घरांतील माणसांनीं तेव्हां माझी खूप चेष्टाही केली. झोंपावं कसं हें त्या पुस्तकांत चित्र काढून दाखाविलं होतं. एक सुंदर खोली, त्याच्या मध्यभागीं छोटासा पलंग, खोलींत अडगळ तर मुळींच नाहीं, उलट अतिशय टापटीपपणा. दोन बाजूला समोरासमोर दोन मोठ्या खिडक्या, त्यापैकीं एकींतून दिसणारा अष्टमीचा चंद्र, छातीपर्यंत पांघरूण घेऊन आपलं तोंड किंचित् उजव्या बाजूला केलेला एक मुलगा, असं

'त्या चित्राचं थोडक्यांत वर्णन करतां येईल. चित्रांतील त्या मुलाची संपूर्णपणें नाहीं तरी मला शक्य होती तेवढी नक्कल करून झोंपणं मला सहज शक्य होतं. आणि त्याप्रमाणें मी कांहीं दिवस झोंपलोंही. पण थोड्याच दिवसांत मला तें जमेनासं झालं. म्हणून मी त्यावेळीं झोंपण्याची ती पद्धत सोडून दिली. आज मला ती आठवण झाली कीं "वेडा रे वेडा" म्हणणाऱ्या माझ्या भावंडांची मला आठवण येते आणि आपण तेव्हां खरंच वेडे होतों, असं वाटूं लागतं......

आज माझ्या झोंपण्यावर कसलंही बंधन नाहीं. अमुक वाजतांच झोंपलं पाहिजे असा आग्रह करणारं कोणी नाहीं किंवा पहांटे (पहांटे कसलं ?....सकाळीं!) लवकर उठवणारंही कोणी नाहीं. डोक्यावर पांघरूण घेऊन झोंपलं तर ओरडणारे आमचे काकाही आतां नाहींत आणि उपडं झोपलं तर छातीवर परिणाम होऊन पुढं कांहींतरी रोग उद्भवेल म्हणून मला धोक्याची सूचना देणारे माझे प्रेमळ मित्रही आज नाहींत. झोंपेंत लोळलं तर लाजत लाजत पण खोटीच तक्रार करणारं सध्यां कोणी नाहीं किंवा "झोंपेंत लेकाचा किती लोळतो" म्हणून तक्रार करणारा माझा भाऊ किंवा मित्रही आज नाहीं. निदान झोंपण्याच्या बाबतींत तरी मी आज पूर्ण स्वतंत्र आहे.

आरोग्यशास्त्र जाणणारे कांहीं सांगोत, पण डोक्यावर पांघरूण घेतल्याशिवाय मला कधींच झोंप येत नाहीं. दुसरीकडे कुठं झोंपायची वेळ आली आणि माझ्या दुर्दैवानें मला पांघरायला कांहीं मिळालं नाहीं तर मग रात्रभर मला झोंप येत नाहीं. अंगावर पांघरूण नाहीं म्हणजे आपलं वस्त्रच कोणीतरी हिरावून नेलं आहे, असं मला वाटूं लागतं. भर उकाड्याच्या दिवसांतही मला पांघरूण

लागतंच आणि तेंही अगदीं डोक्यापर्यंत. मग पांघरूणामुळें शरीर घामानें ओलेंचिंब झालं तरी माझी हरकत नसते. पण पांघरूणा-शिवाय झोंपणं मला कधींच शक्य नसतं.

उपडं झोंपलं म्हणजे शरीराचा सारा भार छातीवर पडतो आणि त्यामुळं पुढं मागं कांहीं रोग उद्भवण्याचा संभव असतो, हें खरं असेलही. पण त्या रोगाच्या भीतिनें उपडं झोंपण्याचं सुख मी कधींच सोडणार नाहीं. त्यामुळं कांहीं इजा झालीच, तर ती मी अगदीं आनंदानें सोशीन. उपडं झोंपण्यांत मला कसलातरी गोड आनंद वाटतो.....

झोंपेंत माझ्या बिछान्यापासून मी लोळत लोळत कुठं जाईन याचा नेम नसतो. "कितीरे लोळतोस ! थोडा कमी लोळ कीं" असं सांगणाऱ्या माझ्या आईच्या सांगण्याचं मला हंसूं येतं. झोंपेंत लोळणं न लोळणं जसं कांहीं माझ्याच हातांत असतं ! झोंप म्हणजे पूर्ण मुक्ति. तेथें कसलं आलं आहे बंधन नी काय ! आणि झोंपेंत किती लोळायचं किंवा मुळींच लोळायचं नाहीं, हें ठरविणं जरी माझ्या हातांत आलं तरी मी असंच ठरवीन कीं अगदीं खूप खूप लोळायचं. अगदीं उलटंसुलटं. रात्रीं आपण कुठं अन् कसे झोंपलों होतों आणि आतां सकाळीं आपण कसे आहोंत, आपलं पांघरूण कुठं आहे वगैरे पाहिल्यावर मला कमालीचा हर्ष होतो. तें रम्य बालपण आपणांला पुन्हां लाभल्यासारखं वाटूं लागतं.

रात्रीं किती वाजतां झोंपलं पाहिजे, किंवा सकाळीं किती वाजतां उठलं पाहिजे, हें मी कधींच ठरवीत नाहीं. कधीं कधीं मी रात्रीं आठच्या दरम्यानच निद्रादेवीच्या स्वाधीन होतों. कधीं कधीं गप्पा मारीत बसलं कीं मग वेळेचं मुळींच भान रहात नाहीं. रात्र ही गप्पा मारण्याकरितां आहे आणि दिवस हा झोंपण्याकरितां आहे, हे एका विद्वानाचे उद्गार मग अगदीं खरे वाटूं लागतात. एखादं सुंदर पुस्तक हातीं पडलं आणि वाचण्यांत गोडी वाटली, तर मग तें वाचून पुरं केल्याशिवाय मला झोंपच येत नाहीं. मग घड्याळांतले काटे कुठं का जाईनात!

रात्रीं अगदींच लवकर झोंपलं तर मग पहांटेस लवकर जाग येते. मग आजीनें मुद्दाम आपणांकरितां केलेल्या सोंवळ्या चहांतील थोडा चहा मला मिळतो. चहा पिऊन आजी कामाला लागते आणि पुन्हां मी गादीवर येऊन पडतों. चहा घेतल्यामुळं आतां झोंप येणं शक्य नसतं. गुलाबी थंडी अंग थोपटीत असते. जवळच्या देवालयां-तील काकडआरतीचे ध्वनी ऐकूं येऊं लागतात. शेजारचा कोणी विद्यार्थी "वनं-वने-वनानि" पाठ करीत असतो. दुसरी कोणी बाई आपल्या मुलांना "वक्रतुंड महाकाय" म्हणायला शिकवीत असते. पलीकडच्या घरांतील कोंबडा कर्कश आवाजांत ओरडत असतो. पहांटेच्या या दिव्य सुखाचा मी आजपर्यंत कितीदां तरी आस्वाद घेतला आहे.

"गेल्या चाळीस वर्षांत दुपारचं आडवं झाल्याचं मला आठवत नाहीं" असं सांगणाऱ्या आमच्या विष्णुभाऊंचं मी एका कानानें ऐकतों आणि दुसऱ्या कानानें सोडून देतों. सबंध रात्र गप्पा मारण्यांत किंवा

वाचण्यांत गेली असली, तर दुपारीं झोंपण्याचा आपणाला हक्कच असतो. पण मुळींच जाग्रण नसतांनाही दुपारीं थोडी वामकुक्षी केल्या-शिवाय मला चैन पडत नाहीं. या वामकुक्षींतून आपण जागे होतों ते स्टोव्हच्या आवाजानें. झोपेनंतर लज्जतदार चहा आणि....छे! आमच्या त्रिंबुभाऊंना कांहींच कळत नाहीं !!

आणि म्हणूनच आज मराठी शाळेंतल्या पुस्तकांतील चित्रां-तल्या त्या मुलाची आठवण झाली कीं माझी खूप करमणुक होते. माझी आजच्या झोंपण्याची आठवण झाली कीं म्हातारपणीं देखील अशीच खूप करमणुक होईल कीं काय, कुणास ठाऊक—

# १७

# आपण-तुम्हीं-तूं !!!

माझ्या टेबलावर जीं तीन पत्रें पडलेलीं दिसत आहेत, तीं मोठीं पाहाण्यासारखीं आहेत. तिन्ही पत्रांचे लिफाफे निरानिराळे आहेत. एक पत्र पोष्टांत मिळणाऱ्या पिवळसर पांढऱ्या लिफाफ्यांतून आलं आहे. दुसरं पत्र या लांबटशा शुभ्र पांढऱ्या पाकिटांत आहे. आणि हें तिसरं पत्र नाजुकशा निळसर लिफाफ्यांत आहे. हीं तिन्हीं पत्रें कोणांकडून आलीं आहेत, तें अगदीं स्पष्ट आहे. कारण तिघांनीं ही डाव्या कोपऱ्यांत आपलं नांव लिहिलं आहे. पण एकदमच सांगून टाकलेलं बरं कीं हीं तिन्हीं पत्रें माझ्या तीन मित्रांकडून आलेलीं आहेत. हे तिघे मित्र एकाच गांवचे रहिवासी आहेत. त्यांच्या गांवीं मी येणार, हें कळल्यावर त्यांनीं मला आपल्याच घरीं उतरायला या असं आग्रहपूर्वक लिहिलं आहे. आणि किती विचित्र योगायोग पाहा ! तिघांनींही एकाच वेळीं हीं पत्रें लिहिलीं आणि मी तीं वाचतों आहे तींही एकाच वेळीं !

त्यापैकीं हें पहिलं पत्र. माझ्या या मित्राशीं माझा इतकासा परिचय नाहीं. दोनचार वेळांच मी त्याला भेटलों असेन. पण त्या त्या वेळीं त्यानें माझं खूप आदरातिथ्य केल्याचं मला चांगलं आठवतं. "पुन्हां येईन तेव्हां आपल्याकडे जास्त दिवस राहीन. हो, आतां ओळख झालीच आहे" असं त्याला त्यावेळीं दिलेलं वचनही मी अजून विसरलों नाहीं. "हो, हो, याल ते खूप दिवस रहायला म्हणून या. घर अगदीं आपलंच आहे, असं समजा" असं बोलून आमची शेवटची भेट झाली होती. त्याच स्नेह्याचें हें पत्र आहे. "आपण इकडे एकदां येऊन जाणार असं कळलं. आपणाला मी मागें बोलावणें करून ठेवलंच आहे. तरीही आपल्या स्मरणार्थ आज मुद्दाम पत्र लिहीत आहे.....आपण आलांत तर आम्हांला आनंदच होईल. तरी आपण केव्हां येत आहांत, तें कळविण्याची कृपा करावी. आम्हीं आपली वाट पाहात आहोंत."

लांबटशा शुभ्र पांढऱ्या लिफाफ्यांत हें जें दुसरं पत्र दिसतंय, तें माझ्या दुसऱ्या एका स्नेह्याचें आहे. माझ्या या स्नेह्याशीं माझा परिचय त्या मानानें जुना आहे. निदान गेलीं वर्ष-दोन वर्षं तरी आम्हीं एकमेकांना चांगले ओळखतों आहोंत. मी त्याच्याकडे चार चार दिवस राहून आलेला आहे आणि तोही कधीं इकडे आला कीं माझ्याकडेच उतरतो. त्याच्या पत्रांतील मजकूर हा असा आहे: "तुम्हीं येणार, हें ऐकलं. फार आनंद झाला. तुम्हांला एकदां भेटण्याची फार फार इच्छा होतीच.......आणि आमची रहाण्याची जागा, बाथरूम वगैरेंतही खूप सुधारणा केली आहे. बाथरूमला फिकट निळा रंग काढला आहे, आणि एक मोठा

आरसाही टांगून ठेवला आहे.......आमच्याकडेच उतरायला या असं मुद्दाम बोलावणं करण्याची तसं पाहिलं तर कांहीं जरूरी नव्हती. कारण तुमच्या या स्नेह्याला तुम्हीं विसरणार नाहीं, याची खात्री आहे........सौ. ची प्रकृति बरी आहे. मुलं वगैरे खुशाल ........ केव्हां येत आहांत, तें कळवावं. म्हणजे स्टेशनवर कोणाला तरी पाठवायला बरं पडेल......वाट पहात आहोंत."

आणि निळसर लिफाफ्यांतलं हें तिसरं पत्र. तें माझ्या अगदीं जिवलग मित्राचं आहे. मराठी शाळेपासून आमची मैत्री आहे. आमची प्रथम ओळख झाली, त्याला एक तप तरी होऊन गेलं. तेव्हांपासून आम्हीं एकमेकांना ओळखत आहोंत, आणि एकमेकांच्या जीवनाशीं अगदीं समरस झालों आहोंत. खरं म्हणजे त्यानें मुद्दाम पत्र लिहून मला आपल्या घरीं बोलावण्याची मुळींच जरूरी नव्हती. त्याची त्या गांवीं बदली झाल्याचं त्यानें मला नुकतंच कळविलं होतं. आणि त्याच गांवीं जायचं मी ठरविलं होतं, त्याचं कारणही मुख्यतः त्याला भेटणें हेंच होतें. अर्थात मी त्याच्याकडेच उतरणार, हें नक्की होतं. तरी ही त्यानें लिहिलं आहे :

" तूं येणार हें कळलं. तुला बोलावणीं करून करून अगदीं कंटाळलों होतों बघ. यापुढें तुला बोलवायचं म्हणून नाहीं, असं ठरवलं होतं...........आपण दोघे पुन्हां किती दिवसांनीं भेटत आहोंत नाहीं? मला वाटतं, गेल्या वर्ष दीड वर्षांत तरी आपण भेटलेले नाहींत.....माझ्यापेक्षांही सुधा तुझी जास्त वाट पाहात्येय. कारण तिच्याजवळ तुला सांगण्यासारखं एक

नाजुक गुपित आहे. पण तूर्त एवढंच......केव्हां निघणार तें कळव म्हणजे तुला उतरून घ्यायला स्टेशनवर येईल. भल्या पहांटे थंडीतून उठून स्टेशनवर येणं कठिण आहे, पण तुझ्याकरितां आलंच पाहिजे. नाहीं तर म्हणायचास, आहे खरा मित्र !"

या तिन्हीं पत्रांचं बहिरंग पाहिलंत ना ? आणि आंतील मजकूरही वाचलात ना ? त्या तीन पत्रांत किती भिन्नता आहे ! एक जण मला "आपण" म्हणतो, दुसरा "तुम्हीं" म्हणतो, आणि माझा खरा जिवलग मित्र मला "तूं" म्हणतो. तीन पत्रांत या ज्या तीन संबोधनांचा उपयोग करण्यांत आला आहे तीं मला अगदीं पसंत आहेत. उलट त्यांत कांहीं फरक असता तर मला तो मुळींच आवडला नसता. पहिल्या पत्रांतील त्या स्नेह्यानें मला तूं म्हणून संबोधलं असतं, तर तें मला मुळींच खपलं नसतं. आपला कांहींतरी अपमान होतोय, असं मला वाटलं असतं आणि माझ्या त्या जिवलग मित्रानें मला तुम्हीं किंवा आपण म्हणून संबोधलं असतं, तर मग लगेच एक कार्ड मी खरडलं असतं, "कांहीं जरूरीच्या कामानिमित्त मला एकाएकीं बाहेरगांवीं जावं लागत आहे. त्यामुळें सध्यांतरी आपणांकडे यायचा बेत रद्द करावा लागत आहे, याबद्दल वाईट वाटतं."

आपण, तुम्हीं आणि तूं ! तीन पायऱ्या आहेत त्या. "आपण" ही त्यांतली पहिली पायरी. आपण असं करा, आपण इथं बसा, आपण चहा घेणार का, आपण सिग्रेट घ्यालच, असं संभाषण कांहीं दिवस झालं कीं आपणच्या ऐवजीं "तुम्हीं" हा शब्द येतो. पण एवढं खरं कीं आपणच्या ऐवजीं तुम्हीं यायला विशेष वेळ लागत

नाहीं. त्या मानानें "तुम्हीं"च्या ऐवजीं "तूं" यायला वेळ लागतो. "आपण चहा घेणार का?" चं पुढें रूप "तूं थोडा चहा घेशील ना?" असं होतं.

आमच्या बहुतेक सर्व कादंबरीकारांनीं "तुम्हीं-तूं" ची गंमत दाखविली आहे. नायक–नायिकेची पहिली भेट होत्ये, तेव्हां दोघं एकमेकांना "आपण" म्हणत असतात. थोड्याच दिवसांत नायक नायिकेला "तुम्हीं" म्हणूं लागतो, पण नायिका त्याला "आपण"च म्हणत असते. पुढं मग एकदां नायक तिला "तूं" म्हणतो आणि त्या "तूं"चा उच्चार झाला कीं दोघांनाही थोडं चमत्कारिक वाटतं आणि दोघांच्याही अंगांतून एक गोड शिरशिरी जाते. नायिका त्याला जेव्हां पहिल्यांदा "तुम्हीं" म्हणते, तेव्हांही अगदीं असंच होतं.

कांहीं कादंबऱ्यांतील नायिका आपल्या पतिराजांना "तूं" म्हणून संबोधतात. पत्नी ही पतिची सखी आहे, हें एकदां मान्य केल्यानंतर पत्नीनें "तूं" म्हणणंच योग्य ठरतं. पण कां कुणास ठाऊक, पतिला तूं म्हणण्याची प्रथा आमच्या हिंदू समाजांत कांहीं तितकीशी रूढ होत नाहीं. पतिला रात्रीं "तूं" म्हणणाऱ्या पुष्कळ स्त्रिया असतीलही. (मला नक्की कल्पना नाहीं!) तरीपण समाजांत वावरतांना नवरेशाही अद्याप संपलेली नाहीं म्हणायची!

मुलें आईला "तूं" म्हणतात, पण वडिलांना "तुम्हीं" म्हणतात, असं कां? कारण उघड आहे. वडिलांच्या मानानें आईचं नातं किती जवळचं! जन्माला आल्यापासून तों निदान वयांत

येईपर्यंत तरी आपलं सारं कांहीं आईच करते. वडिलांचं लक्ष असतं कुठें? मग आईला "तूं" म्हणायचं नाहीं, तर काय "तुम्हीं" म्हणायचं?

माझ्याविषयीं म्हणाल तर मला कोणी "आपण" म्हणावं, कोणी "तुम्हीं" म्हणावं, आणि कोणी "तूं" म्हणावं, हें मी माझ्या मनाशीं अगदीं निश्चित करून ठेवलंय. त्याला कोणी धक्का लावलेला मला नाहीं खपायचा!

# १८

# चिंगी चहा पित्ये !

विसुभाऊंच्या चिंगीची आज वधूपरीक्षा होती. चिंगीनें आपल्या मुखवट्याची अशी कांहीं सजावट केली कीं मला ती ओळखेच ना ! गाल गुलाबी केलेले, कानावर फुगे काढलेले, हास्यांत मोहकता आणि डोळ्यांत मादकता आणलेली ! कां नाहीं आमची चिंगी "पास" होणार ? तसं तिचं नांव जरा ऑंगळ आहे. पण लग्न झाल्यावर तिचे यजमान तिचं नांव बदलतीलच कीं ! आणि नाहींच बदललं तरी काय हरकत आहे ? नांवाशीं काय करायचंय ?

चिंगीला मी कांहीं खास सूचना दिल्या होत्या आणि त्यांची तालीमही घेतली होती. प्रवेश कसा करायचा, केव्हां वर पाहायचं, कसं चोरून "त्यांच्याकडे" पाहायचं आणि त्यांची दृष्टि भिडल्यास कसं लाजायचं, बोलतांना कसा आवाज काढायचा, कारण नसतांना उगाच हंसल्यासारखं कसं करायचं, चहाचे कप कसे आणायचे आणि कसं परत जायचं, याचं पूर्ण शिक्षण मी गेले आठ दिवस तिला

दिलं होतं. आणि आज सकाळीं त्याची रंगीत तालीमही घेतली होती.

चिंगी चांगली गोरी मुलगी, अंगानें सडपातळ, दिसायला मोहक आणि मी शिकवून तयार केलेली. त्यामुळें वधूपरीक्षेंत पास होऊन ती लगेच पिवळी होणार, याबद्दल मला तिळमात्रही शंका नव्हती.

पण तें विसुभाऊंच्या नशीबीं नव्हतं !

नवऱ्याकडचीं माणसें आलीं. सर्वांना ती पसंत पडली. नवरोबा-देखील खुष दिसले. सारं कांहीं जमलं, अशा अर्थाची मी विसु-भाऊंना खूणही केली.

पण—

नंतर चिंगी चहा घेऊन आली. भावी सासऱ्याच्या सांगण्या-वरून तेथेंच खुर्चीवर बसली. सासऱ्यानें तिलाही चहा घेण्यास सांगितलं. चहाचा एक कप कमी पडतोय, असं पाहून मी आंत गेलों. हिला म्हटलं—"बघ चिंगी कशी दिसतेय. नाहींतर तूं- ! पात्र दिसत होतीस नुसती ! मीच म्हणून पास केली !" नेहमींच्या लकबींत "आहे माहित तुमचं" अशा अर्थाचा तिनें मुरका मारला. मी चहा घेऊन बाहेर आलों.

चिंगी चहा पीत होती. सासरची सारी मंडळी कपानें चहाचे घोट घेत होती. एखादा थेंब खालीं पडूं नये, म्हणून त्या सर्वांनीं दुसऱ्या हातांत बशी धरली होती. ही सारी मंडळी चहा पितां पितां इकडच्या तिकडच्या चार गप्पा मारीत होती. नवरा-मुलगा चहा पीत होता, त्याचा रुबाब तर औरच ! त्यावेळचा त्याचा तो रुबाब मलाही जमेल कीं नाहीं कुणास ठाऊक !

आणि आमची चिंगी? कपांतील चहा तिनें बशींत ओतला होता आणि तोही एकदम. तिनें बशी तोंडाला लावली होती. किंचित् डचमळल्यानें थोडासा चहा पातळावरही सांडला होता! मला असा राग आला चिंगीचा! पण करणार काय? विसुभाऊ चहा घेत नाहींत आणि त्यांची ही लेक चहा पित्ये, पण तो हा असा!

आणि म्हणूनच दोनच दिवसांत त्यांनीं जेव्हां मुलगी नापसंत असल्याचं कळविलं, तेव्हां मला मुळींच आश्चर्य वाटलं नाहीं. विसुभाऊ विचारतात—"अरे, असं कसं झालं? सर्वांना तर पसंत पडल्यासारखी दिसत होती. पण प्रत्यक्ष मत मात्र सर्वांनीं तिच्याविरुद्ध दिलं ना? काय चमत्कार हा!"

चिंगी नापसंत कां झाली, हें मी तिला अद्याप सांगितलेलं नाहीं. पण तेव्हांपासून चहा कसा प्यावा, याचे धडे मात्र मी तिला देतोंय!

# १९

# देव आणि मी

लहानपणीं मला देवाबद्दल मोठी आस्था होती. आमच्या आजोळीं निरनिराळ्या आकाराचे आणि रंगाचे नाहीं म्हटलं तरी दोन अडीच डझन तरी देव होते. त्यांचं बाह्य रूप कांहीं तसं पाहाण्यासारखं नव्हतं. आजोळच्या मानानें आमचे घरचे देव दिसण्यांत बरे होते. मुख्य म्हणजे त्यांत दगडधोंडे जास्त नव्हते आणि जे होते तेही अगदीं नाजुक. पुष्कळसे देव पितळेचेच होते आणि महिन्याभरानें त्यांना एकदां चिंचेचं पाणी दिलं कीं ते अगदीं चक्क होत, अगदीं न्हालेल्या स्त्रीसारखे. माहेरची प्रत्येक गोष्ट जशी स्त्रियांना जास्त प्रिय वाटते, तसंच पुरुषांचं असतं कीं काय कुणास ठाऊक! नाहींतर घरच्या देवांपेक्षां मला आजोळचे देव इतके कां आवडले असते?

मी देवांची पूजा करणें केव्हां सुरू केलं, हें मळा नक्की आठवत नाहीं. पण मला जेव्हां साधारणपणें कळूं लागलं,

तेव्हांपासून मी देवांची पूजा करूं लागलों असावा, असं वाटतं. पूजेला चांगलीं फुलें मिळावींत, म्हणून मी खूप भांडलोंही होतों. पहांटेस उठून दुसऱ्यांच्या कुंपणांतील गुलाबाची फुलें चोरून आणलीं होतीं. श्रावणाच्या महिन्यांत सारं बळ एकवटून पारिजातक हालविले होते आणि फुलांपेक्षां पाण्याचे थेंबच जास्त पडले होते! सोनचांफ्याच्या झाडावरून एकदां पाय सरून मी जमिनीवर दाण-कन् आदळलों होतों.

आणि हें सारं मी देवांकरितां करीत होतों. तेव्हां पहांटेस उठण्यासदेखील मी मागेंपुढें पाहिलं नाहीं. देवांकरितां मी चोऱ्या केल्या आणि अनेक धाडसेंही केलीं.

कित्येक पावसाळे आले आणि गेले. कित्येक वर्षं कडाक्याची थंडी पडली. कित्येकदां उन्हाळ्यानें कहर केला. मी मोठा झालों आणि देवावरचा माझा विश्वास साफ उडाला.

देवावरची देव या स्वरूपांतील निष्ठा नाहींशी झाली आणि त्याची जागा व्यक्तिनें घेतली. कांहीं विशिष्ट देव मला आवडूं लागले आणि कांहींबद्दल तिरस्कार वाटूं लागला.

मला आजही कृष्ण आवडतो. गोकुळाष्टमीचा उत्सव साजरा करण्यांत, दह्याच्या हंड्या फोडण्यांत, फुगड्या खेळण्यांत आणि नदींत डुंबण्यांत मला आजही खूप मौज वाटते. पण त्याहीपेक्षां मला कृष्णाचं दुसरं एक रूप जास्त प्रिय आहे.

आपलीं वस्त्रें नदीकांठीं ठेऊन गौळणी स्नान करताहेत. इकडे कृष्ण येतो आणि तीं सारीं वस्त्रें गोळा करून तीं वृक्षावर

नेऊन ठेवतो आणि तेथेंच बसून आपला पांवा वाजवतो. आहे कीं नाहीं गंमत? आहे कीं नाहीं काव्य ?–आणि म्हणूनच मला कृष्णाबद्दल एक प्रकारचा हेवा वाटतो.

माथेरानला एकदां गंमत झाली. कांहींसा असाच प्रकार झाला होता. माथेरानचीं माकडें प्रसिद्धच आहेत. आपलीं वस्त्रें एका बाजूला काढून ठेऊन कांहीं स्त्रिया तेथील सिंप्सनच्या धबधब्याखालीं स्नान करीत होत्या. एका चावट माकडाच्या मनांत काय आलं कुणास ठाऊक, तें सारीं वस्त्रें जमा करून घेऊन पळत सुटलं!

पण त्या माकडापेक्षां कृष्ण नक्कीच श्रेष्ठ. माकड वस्त्रें घेऊन पळून गेलं. पण कृष्ण कसला वस्ताद! तो तेथेंच "गम्मत" पहायला वृक्षावर बसला. आहे कीं नाहीं कृष्ण !

आणि रामाबद्दल मला तितकाच तिरस्कार आहे. एका परटानें शंका घेतली म्हणून त्यानें सीतेचा त्याग केला! शर्थ झाली!! रामाला सीतेपेक्षां आपलं साम्राज्य जास्त वाटलं! कां नाहीं त्यानें सीतेकरितां राज्यत्याग करून वनवास स्वीकारला? त्यापेक्षां इंग्लंडचे आठवे एडवर्ड कितीतरी बरे. मिसेस सिंप्सनवर त्यांचें प्रेम होतं आणि त्याकरितां त्यांनीं राज्यत्याग केला. पण लोकमंगल करणारा हा राम आपल्या पत्नीचाच त्याग करतो!

म्हणूनच मला रामाबद्दल तिरस्कार वाटतो. एका परटानेंच नव्हे तर साऱ्या समाजानें रान उठवलं तरी मी असलं कृत्य करणार नाहीं!

आणि गणपतिचं स्थान माझ्या दृष्टीनें कांहींसं भिन्न आहे. त्याच्याजवळ नेहमीं उंदीर बसलेला असतो. मला तर उंदरांची फारच भीति वाटते. रात्रीं उंदरांनीं जरा कुठं आपलं अस्तित्व दाखवायला सुरुवात केली कीं मी आंतल्या आंत थरथर कांपूं लागतों. दिवसांही एखादा उंदीर दृष्टीस पडला कीं मला त्याची भीति वाटूं लागते. एवढंच नव्हे तर बंद पिंजऱ्यांतील उंदरापासून देखील मी पांच पांच फूट दूर उभा रहातों !

पण या गणपतिला त्या उंदराची कांहीं भीति वाटतेय का ? मुळींच नाहीं. त्याच्याजवळ तर नेहमीं उंदीर बसलेला असतो. तो सुखकर्ता आणि दुःखहर्ता आहे कीं नाहीं कुणास ठाऊक, पण माझ्याबाबतींत तरी तो भीतिहर्ता ठरणार आहे.

निदान मी तसा प्रयत्न करीत आहे. या बाबतींत मी गणपतिचा आदर्श डोळ्यांपुढें ठेवला आहे. उंदरांत तसं भिण्यासारखं कांहींच नसतं, जरा च-च केलं कीं तो दूर पळतो, आणि पळाला नाहींच तरी तो आपल्याच तंद्रींत असतो, कांहीं उपद्रव करीत नाहीं आणि म्हणूनच त्यांत भिण्यासारखं कांहींच नाहीं, अशी मी माझ्या मनाची समजूत करून घेण्याचा प्रयत्न करतोंय. पण मला कांहीं तें जमत नाहीं. आणि म्हणूनच मला गणपतिबद्दल एक निराळ्याच प्रकारचा आदर वाटतो.

पण या सर्वांपेक्षांही मला शंकर आवडतो. त्याच्या डोक्यांत चंद्राची कोर असण्याला जरी माझा विरोध असला तरी शंकराबद्दल माझं मत फार चांगलं आहे. कारण तो एकदम कांहींतरी करून

टाकलि, असा मला विश्वास आहे. तांबे कवि या रुद्राला आव्हान देतात—

'डुम् डुमत डमरु ये, खण् खणत शूल ये,
शंख फुंकीत ये, येइ रुद्रा !'

आणि हा रुद्र येऊन काय करणार माहित आहे ?

'मुकुट रंकास दे, करटि भूपाप्रती —'

आणि म्हणूनच मला रुद्राबद्दल अतिशय आदर आहे आणि तो कांहींतरी करील, असा विश्वास आहे. मी नेहमीं शंकराच्या मूर्तिकडे आदरमिश्रित कुतूहलानें पाहात असतों, याचं कारण हेंच.

गीतेची शिकवण आहे :

'अभ्युत्थानमधर्मस्य संभवामि युगे युगे'

काय असेल तें असो, पण यावर माझा विश्वास आहे. आजच्या या अधर्माच्या युगांत तो कोणतें रूप घेऊन धर्म प्रस्थापित करणार आहे, याची मी मोठ्या उत्सुकतेनें वाट पाहात बसलोंय.

# १०

# चंद्रावर स्वारी !

“काय बाई तो सिनेमा! ते चेहेरे काय आणि वातावरण काय! आणि पार्श्वसंगीत होतं तें तरी किती भयंकर! मला बाई दोन दिवस झोंपच नाहीं आणि चुकून डोळा लागलाच तर एकदम कांहींतरी भयंकर स्वप्न पडून मी दचकून जागी होत्यें आणि मग असा कांहीं घाम सुटतो कीं........”

दोन दिवसांपूर्वींच कुठचा तरी सिनेमा पाहून आलेल्या शेजारच्या वहिनी सांगत होत्या, मी ऐकत होतों आणि मनांतल्या मनांत हंसत होतों. वहिनींचं हें कांहीं आजचंच नव्हतं. साधारणतः कुठच्याही सिनेमाला त्या गेल्या कीं नंतर त्यांचं असंच कांहींतरी व्हायचं आणि मग शेजारीं रहाणाऱ्या मला हें पुराण ऐकून घ्यायला लागायचं. वहिनी आधीं फारशा कधीं सिनेमाला जायच्या नाहींत. पण पतिराजांचा अगदींच हिरमोड होऊं नये म्हणून कधीं गेल्याच तर मग पुढं दोन दिवस पतिराजांचा चांगलाच हिरमोड व्हायचा! मी मनांत म्हणायचा, “काय बाई आहे ही!”

पण पुढं पुढं मला कळून चुकलं कीं वहिनींसारखेच अनेक पुरुष आणि स्त्रिया आमच्यांत आहेत. दोन घटका करमणुकीकरितां पाहिलेल्या सिनेमानें ते इतके गांगरून जातात कीं मग पुढचे दोन दिवस तरी त्यांना स्वतःची शुद्ध रहात नाहीं !

पण मला असा अनुभव कधींच आला नव्हता. अगदीं भयानक, किळसवाणे, अंगावर शहारे आणणारे, भूताखेतांचे कितीतरी सिनेमा मी पाहिले पण त्यांचा यत्किंचितही परिणाम माझ्यावर झाला नव्हता. माझी झोंप उडाली नव्हती कीं कांहीं स्वप्न पडलं नव्हतं. म्हणूनच वहिनींसारख्या लोकांची मी खूप थट्टा करायचा.

पण परवां माझी स्थिति झाली अगदीं वहिनींसारखी. तो सिनेमा पाहिल्यापासून माझ्या डोळ्याला डोळा लागलेला नाहीं आणि थोडीशी झोंप आलीच तर मी एकदम दचकून उठतों. ती कल्पना मनांतून काढून टाकण्याकरितां मी आपलं चित्त दुसरीकडे गुंतवायचा प्रयत्न करूं लागतों आणि तेवढ्यांत ती आठवण झाली कीं पुन्हां एकदम दचकतों......

त्या सिनेमाचा एवढा परिणाम होण्यासारखं त्यांत विशेष असं कांहींच नव्हतं. त्यांत उघडींनागडीं चुंबनें नि आलिंगनें नव्हतीं, बीभत्सता नव्हती आणि नुसत्या कल्पनेनं घाम सुटावा, इतकं भयानकत्वही त्यांत नव्हतं. तरीही तेव्हांपासून मी मनांतल्या मनांत घाबरतोंय, तळमळतोंय.

हा सिनेमा होता चंद्रावर स्वारीचा. चंद्रावर स्वारी कशी करतां येईल, याचं काल्पनिक चित्र त्यांत रेखाटलं होतं आणि उद्यां

माणूस चंद्रावरच जाऊन कशी वस्ती करूं शकेल, तें दाखवलं होतं.

° चंद्रावर स्वारी ! म्हणजे आमच्यांतले कांहीं लोक उद्यां चंद्रावर जाऊन रहाणार कीं काय ? छे ! मला ही कल्पनाच असह्य वाटते.

मला स्वतःला चंद्राबद्दल अतिशय आकर्षण वाटतं. लहानपणीं माझी आई मला कडेवर घेऊन भरवायची आणि मी जास्तच नखरे करायला लागलों कीं चंद्र दाखवायची ! चंद्र पाहिला कीं मग मी उड्या मारायला लागायचा ! !

मी किंचित् मोठा झालों आणि मराठी शाळेंत जाऊं लागलों. त्यावेळीं दोन गाण्यांनीं मला वेड लावलं होतं. " येरे येरे पावसा " आणि " चांदोबा चांदोबा भागलास का ? " आणि वेळीं अवेळीं आम्हीं हीं गाणीं म्हणत असायचे. पूर्णिमेचा चंद्र नुकताच उगवला आहे. चंद्राकडे पाहात आणि आजींच्या गोष्टी ऐकत आम्हीं मोठ्या खुषींत बसलों आहोंत. पण तेवढ्यांत चंद्र कुठच्या तरी झाडामागें लपला ! मग आम्हीं त्याला विचारतों आहोंत :

" चांदोबा चांदोबा भागलास का ?
निंबोणिच्या झाडामागें लपलास का ? "

मग चंद्र पुन्हां दिसायला लागायचा आणि आम्हीं हर्षानें टाळ्या वाजवायचे—लहानपणीं आम्हीं चंद्राबरोबर लपंडाव खेळलों आहोंत !

मी हायस्कूलांत गेलों आणि हरीभाऊंची कुठची तरी एक कादंबरी वाचली. त्यांत सुरुवातीलाच चांदण्याचं वर्णन आहे. पूर्णिमेचं चांदणं पडलं आहे, चंद्राचं प्रतिबिंब पाण्यांत पडलं आहे आणि एका नौकेंत एक सुंदर तरुणी बसली आहे. तेथें तीन चंद्र असल्याची शंका कादंबरीकारानें उपस्थित केली आहे. त्या कादंबरींतलि तें प्रकरण मला अतिशय आवडायचं. त्यांतल्या कित्येक ओळी मी तेव्हां मुखोद्गत करून ठेवल्या होत्या—

मी मोठामोठा होत गेलों आणि चंद्राबद्दलचें आकर्षण जास्त जास्त वाढत गेलं. चांदण्यांत आम्हीं मित्रमैत्रिणींनीं खूप जलविहार केला, समुद्रावरच्या वाळूंत बसून आम्हीं तासन् तास गप्पा मारल्या. त्याच किनाऱ्यावरच्या पुळणेंत आम्हीं दोघांनीं—

संकष्टीला रात्रीं चंद्र दिसल्याशिवाय जेवायचं नाहीं, असं माझ्या आईचं व्रत होतं. एकदांचा चंद्र दिसला कीं त्याला नमस्कार करायची आणि मग ती जेवायची! पण तिला उद्यां कोणी सांगितलं, "कसला आहे चंद्र? अग, तो एक ग्रह आहे या पृथ्वीसारखा आणि थोड्याच दिवसांत तेथें लोक रहायला जाणार आहेत." यावर आई काय उत्तर देईल कुणास ठाऊक !

चंद्राच्या किरणांत अमृत असतं म्हणतात आणि चांदण्यात बसण्यांत म्हणूनच आल्हाद वाटत असावा. दिसायला जो इतका सुंदर, इतका आल्हाद देणारा, आबालवृद्धांना सुखविणारा, सामान्यांना रिझविणारा, तरुण तरुणींना बेभान करणारा आणि अमृताची वृष्टि करणारा तो चंद्र... त्या चंद्रावरही जातां येतं, तेथेंही मला वाटलं

तरी मी जाऊं शकतों, लोक जाऊन राहूं शकतात, ही कल्पनाच मला असह्य वाटते. चंद्रावर स्वारीच्या कल्पनेनं माझा थरकांप होऊं लागतो.

समजा, उद्यां एखाद्या पूर्णिमेच्या दिवशीं आम्हीं दोघं समुद्राच्या किनाऱ्यावर पुळणींत बसलों आहोंत. लाटांचें संगीत चालू आहे आणि गार गार वारा गोड गोड गुदगुल्या करतोय. चंद्राबद्दल मी एवढ्यांत कांहीं म्हटलं कीं मग ही म्हणेल—"आहे माहित तुमचा तो चंद्र. शेजारच्या ठकीचा नवरा कीं नाहीं, तेथेंच जाऊन राहिला आहे आणि तेथें बिऱ्हाडाला जागा मिळाली कीं ठकीही म्हणे तेथेंच रहायला जाणार आहे!" मग मी काय बोलणार ?

उद्यां खरोखरच चंद्रावर स्वारी झाली, तर काय होईल ? माझे येथील कितीतरी मित्र, कितीतरी मैत्रिणी, दूरचे स्नेही, साहाय्यक, उपकारकर्ते, दुष्टावा करणारे, हेवा वाटणारे, ज्यांनीं केवळ प्रेम केलं असे कित्येक स्नेही हे जर चंद्रावर जाऊन राहिले, तर मग मी इथें राहून करूं तरी काय? आपल्या घनिष्ठ परिचयाचा एखादा मित्र दोनचार दिवसांकरितां कुठें गेला तर काय होतं! आणि हे तर कायमचे दूर जाणार !

मग मी विचार करूं लागतों आपणांलाही जातां येईलच कीं चंद्रावर, आणि क्षणभर खर्चाचा प्रश्न बाजूला ठेवून मी चंद्रावरच रहायला गेलों आहे, अशी कल्पना करूं लागतों. माझ्या परिचयाची सर्व मंडळी येथें आली आहे. पण तरीही मला चुकल्याचुकल्यासारखं होतंय, कांहींतरी खटकतंय्........

मी चंद्रावर आलों, इतर स्नेही आले, पण पृथ्वी तिकडेच राहिली कीं ! आणि पृथ्वीवरचं तें सौंदर्य तिकडेच राहिलं ! पृथ्वीवरच्या ज्या ज्या स्थळांना माझ्या आयुष्यांत महत्त्वाचं स्थान प्राप्त झालं, ज्यांच्याभोंवतीं माझ्या स्मृती अजून प्रदक्षिणा घालताहेत आणि मन घुटमळतंय् तीं स्थळें इकडे चंद्रावर कुठचीं येणार ? माडांच्या अन् पोफळीच्या बागा शिंपण्यांत आमचे दिवसाचे कित्येक तास निघून जात, तें आमचें कोकणांतील खेडं कुठें आहे ? एखादा तरी आंबा पडतोय का म्हणून तासन् तास जेथें आम्ही ताटकळत उभे राहिलों तीं आजोळची आंबराई कुठें आहे ? ज्या नदींत आम्हीं चांदण्यांत जलविहार केला, ती नदी कुठें आहे ? समुद्रकिनाऱ्यावरच्या ज्या पुळणींत आम्हीं प्रीतीच्या आणाभाका घेतल्या तो किनारा आणि तो गुरगुरणारा समुद्र कोठें आहे ? आणि कुठें आहे गोव्यांतील सौंदर्य ? कुठें आहेत माथेरान आणि लोणावळ्याचीं रमणीय दृश्यें ? कुठें आहेत गंगा आणि यमुना ? कुठें आहे ताजमहाल ? आणि कुठें आहे अमृताचं वर्षाव करणारं तें चांदणं ?

छे ! उद्यां चंद्रावरच जर वस्ती करायला गेलों, तर कितीतरी गोष्टींना मुकावें लागणार. आपण गेलों नाहीं आणि इतर गेले तर त्यांचा वियोग होणार आणि ते त्या सुंदर चंद्रावर रहातात, याचा मनाला अतिशय विषाद वाटणार आणि मग चंद्राबद्दलचें आकर्षण आपोआपच कमी होणार. चंद्रावर रहायला जावं कीं न जावं, ह्याचा माझ्या मनांत मोठाच गोंधळ माजतोय आणि कांहींच सुचत नाहींसं होतंय.

शास्त्रज्ञ चंद्रावर स्वारी करण्याचे कितीही प्रयत्न करोत, चंद्रावर स्वारी होऊं नये, अशी मी दररोज मनांतल्या मनांत प्रार्थना करतोंय !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
७७७९
REFBK-0007771

★

" 'चंद्रावर स्वारी !' या श्री. ग. कृ. कार्लेकर यांच्या लघु-निबंधसंग्रहानें अलीकडील ललित निबंधांत चांगली भर टाकली आहे. हे निबंध नुसते लघु नसून ललितहि आहेत. कांहीं वेळां निबंध ललित असूनहि मर्यादे-बाहेर वाहवत चाललेला आढ-ळतो. तसा प्रकार या निबंध-संग्रहांत नसून मांडणीचा आटोपशीरपणा व भाषेचा चुर-चुरीतपणा हे त्यांत उठून दिसतात. खुसखुशीत भजीं खाण्यांत रंगणाऱ्याचें व लज्जत-दार चहाचे घोट घेऊन सिगारेट शिलगावणाऱ्यानें जें चित्र लेख-कानें रेखाटलें आहे तेंच त्याच्या सुबक मांडणीचें व खुसखुशीत भाषेचें प्रतीक होय एवढें सांगि तलें असतां पुरे."

— प्रा. द. के. केळकर

★

# आमचीं कांहीं प्रकाशनें

## कादंबऱ्या

| | | |
|---|---|---|
| अपराध कुणाचा | ना. रा. अभ्यंकर | ४—८—० |
| पुनर्मीलन | वि. श्रा. जोशी | ४—०—० |
| प्रेमवेडी | पां. गो. लोहोकरे | १—१२—० |
| गोड आठवण | शांताराम आडिवरेकर | २—८—० |
| जगाला कळलें पाहिजे | वी. रघुनाथ | ३—८—० |

## लघुकथा

| | | |
|---|---|---|
| जगूं आम्हीं जीवन | शशिशेखर वेदक | ३—४—० |
| पहिली भेट | सौ. शैला पाठक | १—८—० |
| मोठीं वर्तुळें | वासुदेव पोवळे | ३—०—० |
| सुखदुःख | उमाकांत ठोमरे | ३—०—० |
| अजब चीज | ग. गं. जतकर | ३—४—० |
| नवें तें हवें | राम कृ. जोशी | ३—४—० |
| रंगरूप | उमाकांत ठोमरे | ३—०—० |

## लघुनिबंध

| | | |
|---|---|---|
| यमुनाजळीं | बालशंकर देशपांडे | २—४—० |
| सिंधु लहरी | पां. गो. वेलणकर | १—१२—० |
| वऱ्हाडी कणसें | बालशंकर देशपांडे | २—०—० |
| चंद्रावर स्वारी ! | ग. कृ. कार्लेकर | २—८—० |

**श्री समर्थ बुक डेपो,**

गिरगांव, मुंबई ४